| लातूर | वर्ष ३५ वे | अंक १४८ | शनिवार, दिनांक २९ ऑगस्ट २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## नेपाळ महापूर: मृतांची संख्या ६२६ वर! ३२० भारतीय अजूनही बेपत्ता

**नवी दिल्ली/वृत्तसेवा: नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुराने मोठ्या प्रमाणावर हाहाकार उडवला आहे. या नैसर्गिक आपत्तीत अडकलेल्या भारतीयांबाबत आता मोठी माहिती समोर आली आहे. नेपाळमधील पूरग्रस्त भागांतून अद्याप ३२० भारतीय नागरिक बेपत्ता असल्याची अधिकृत माहिती भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. याशिवाय भारतीय वंशाचे १०० हून अधिक नागरिक अद्याप संपर्काबाहेर आहेत. नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी भारत सरकारकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.**



**मृतांचा आकडा ६२६ वर; बचावकार्य सुरूच**

नेपाळमध्ये सलग तिसऱ्या दिवशीही शोध आणि बचावकार्य सुरू असून, आतापर्यंत मृतांचा एकूण आकडा ६२६ वर पोहोचला आहे. भोटेकोशी नदीच्या पात्रातील पाण्याची पातळी अचानक वाढल्याने पुन्हा एकदा पुराचा धोका निर्माण झाला आहे. या संकटामुळे स्थानिक प्रशासनाची चिंता वाढली असून, सुमारे १,९२४ लोक अद्यापही बेपत्ता आहेत. यामध्ये ५१७ परदेशी पर्यटकांचा समावेश आहे.

नेपाळच्या आठ जिल्ह्यांमधून आतापर्यंत ६२६ मृतदेह हाती लागल्याची माहिती नेपाळच्या पोलिसांनी दिली. नवलपारसी पूर्व जिल्ह्यात १५४ मृतदेह सापडले आहेत. आतापर्यंत सर्वाधिक जीवितहानी चितवन जिल्ह्यात झाल्याचे दिसत असून तेथे २३३ मृतदेह हाती लागली आहेत. अद्याप १,९२४ लोक बेपत्ता आहेत. नेपाळच्या पर्यटन मंडळाने माहिती दिली आहे की, आतापर्यंत ८५ भारतीयांसह १२१ परदेशी पर्यटकांची सुटका करण्यात आली आहे. त्यात ९ दक्षिण कोरियाचे आणि १६ चीनचे नागरिक आहेत. किमान ९३,००० लोक पूरस्थितीने प्रभावित आहेत, असा अंदाज 'रेड क्रॉस'ने व्यक्त केला आहे. तर १७,०० मुलांना तातडीची मदत असल्याचे 'युनिसेफ'ने सांगितले.

**तिबेट सीमेवरील ४०० भारतीय भाविक सुरक्षित**

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायसवाल यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेले सुमारे ४०० भारतीय नागरिक चीनच्या (तिबेट) सीमेवर अडकले आहेत. दिलासादायक बाब म्हणजे हे सर्व भाविक पूर्णपणे सुरक्षित आहेत.

तिकडे टेलिफोन आणि संपर्क यंत्रणा सुरू असल्याने हे सर्व नागरिक आपल्या कुटुंबाच्या संपर्कात आहेत. भारतीय दूतावास त्यांचे गटप्रमुख आणि टूर ऑपरेटर्सशी सतत बोलून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

**शोध व बचावकार्य**

शोध व बचावकार्यामध्ये ७,४५१ सुरक्षा सैनिक सहभागी झाले आहेत. त्यामध्ये नेपाळ लष्कराच्या २,३९१ सैनिकांचा समावेश आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. त्याचवेळी भोटेकोशी नदीच्या पाण्याची पातळी वाढल्यामुळे नव्याने पूर येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## साखर स्वस्त होणार?

### २ लाख टन साखर घेऊन ४-५ जहाजे भारताकडे रवाना

**नवी दिल्ली/वृत्तसेवा:** गेल्या काही महिन्यांपासून साखरेच्या दरात झालेल्या मोठ्या वाढीनंतर आता ग्राहकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. साखरेचा पुरवठा वाढवण्यासाठी केंद्र सरकारने केलेल्या उपाययोजनांमुळे बाजारातील परिस्थिती सुधारत असून, साखरेचे दर पुन्हा कमी होऊ लागले आहेत. सणासुदीचा हंगाम जवळ येत असताना साखरेचा पुरेसा साठा उपलब्ध होण्याची शक्यता असल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळू शकतो. जेके इंडिया ईग्रीटेक लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक उप्पल शाह यांनी साखरेच्या बाजारातील सध्याच्या परिस्थितीबाबत माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दोन महिन्यांत साखरेच्या दरात मोठी वाढ झाली होती. बाजारात साखरेचा पुरवठा कमी असणे आणि हवामानाशी संबंधित चिंता यामुळे ही दरवाढ झाली. काही

ठिकाणी साखरेचा कारखाना दर म्हणजेच 'एक्स-मिल' दर ६,७०० ते ७,००० रुपये प्रति क्विंटलपर्यंत पोहोचला होता.

**सरकारचे काही महत्त्वाचे निर्णय**

सणासुदीचा काळ जवळ आल्याने साखरेच्या



दरातील ही वाढ चिंतेची बाब बनली होती. मात्र, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले. मोठ्या ग्राहकांकडे, व्यापाऱ्यांकडे आणि इतर ठिकाणी साठवून ठेवलेला साखरेचा साठा बाजारात आणण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. त्याचबरोबर शुल्कमुक्त साखर आयातीला परवानगी देण्यात आली आहे.

उप्पल शाह यांच्या माहितीनुसार, सुमारे २ लाख टन साखर घेऊन ४ ते ५ जहाजे निर्यातदार देशांच्या बंदरांमधून भारताकडे रवाना झाली आहेत. ही साखर सप्टेंबरच्या मध्यापर्यंत भारतात पोहोचण्याची अपेक्षा आहे. भारतात आल्यानंतर या साखरेवर प्रक्रिया करून ती बाजारात आणली जाईल. त्यामुळे बाजारातील साखरेचा पुरवठा मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे.

## अपघाताची चिंता, ५०० श्वान, गोवंशांना 'रिफ्लेक्टिव्ह रेडियम कॉलर'चे कवच

**लातूर/प्रतिनिधी :** रक्षाबंधनाच्या पवित्र सणाचे औचित्य साधून यंदा रक्षणाचे हे प्रेमळ नाते केवळ मानवांपुरते मर्यादित न राहता, ते मुक्या जीवांपर्यंतही पोहोचले आहे. ''उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन''ने पुढाकार घेत उत्कर्ष रक्षा २०२६ ही विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. शहरातील विविध रस्त्यांवर भटक्या श्वानांचा वाढता वावर आणि त्यांच्यामुळे होणारे छोटे-मोठे अपघात ही चिंतेची बाब होती. याच वास्तवाचे भान ठेवून, फाउंडेशनने ५०० श्वान, ५०० गोवंशीय प्राणी आणि १०० मांजरींना ''रिफ्लेक्टिव्ह रेडियम कॉलर'' लावले आहेत. रात्रीच्या अंधारात वाहनचालकांना हे प्राणी दूरवरून दिसतील आणि त्यांचा जीव वाचेल, हाच यामागचा मुख्य हेतू आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ महापौर जयश्री सोनकांबळे आणि उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि फाऊंडेशनमध्ये कार्यरत कर्मचारी, स्वयंसेवकांच्या करण्यात आला. गतवर्षी लातूरमध्ये वाहनांच्या धडकेत तब्बल ७४९ श्वानांचे अपघात झाले, ज्यातील २५९ श्वानांना आपला जीव गमवावा लागला. ही आकडेवारी अंगावर काटा आणणारी आहे. याच सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून, उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन सलग तिसऱ्या वर्षी हा उपक्रम राबवत आहे. तसेच, महापालिकेच्या सहकार्याने ''प्राणी जन्म नियंत्रण'' अंतर्गत श्वान निर्बीजीकरणाचे कामही ही संस्था अत्यंत निष्ठेने पार पाडत आहे.





उत्कर्ष रक्षा २०२६ या विशेष मोहिमेत १५ स्वयंसेवक आणि कर्मचारी अविरत कष्ट घेत आहेत. उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनने उत्कर्ष रक्षा २०२६ ला दिलेली ही प्राथमिकता खरोखरच कौतुकास्पद आहे. मुक्या जीवांबद्दलची ही संवेदनशीलता समाजाला एक नवी प्रेरणा देऊन जाते. मानवाप्रमाणेच या जीवांनाही जगण्याचा हक्क आहे, हे ब्रीद वाक्य जपत लातूरकरांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले आहे. खऱ्या अर्थाने या रक्षाबंधनाने माणुसकीचे नवे नाते निर्माण केले आहे. दरम्यान, रस्ते अपघातांतून भटक्या व निराधार प्राण्यांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेला हा उपक्रम समाजमनावर सकारात्मक ठसा उमटवणारा ठरत आहे.

रक्षाबंधननिमित्त सामाजिक बांधिलकीतून उपक्रम दरवर्षी रक्षाबंधनानिमित्ताने सामाजिक बांधिलकी म्हणून असे उपक्रम राबविण्यात येतात. हे या उपक्रमाचे तिसरे वर्ष आहे. तरी श्वानांचा वाढता उपद्रव पाहता प्रतिबंधात्मक उपाय आणि त्यांच्याही जीवाच्या रक्षणासाठी प्राणीमित्रांनी पुढे यावे.केवळ कॉलर लावणे नव्हे, तर या प्राण्यांचे लसीकरण करून त्यांना पुन्हा त्यांच्या अधिवासात सुरक्षित सोडण्याचे कामही फाउंडेशनकडून होत आहे. निवृत्ती देशमुख, व्यवस्थापक उत्कर्ष फाऊंडेशन, लातूर.

## शिवीगाळ व धमकी प्रकरणी आरोपीला १० महिन्यांची शिक्षा

**लातूर/प्रतिनिधी :** शिवीगाळ करून धमकी दिल्याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात न्यायालयाने आरोपीला एकूण १० महिन्यांची साधी कैद सुनावली आहे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी कोर्ट क्रमांक १, उदगीर येथील न्यायालयाचे न्यायाधीश व्ही. आर. घराळ यांनी गुरुवारी, दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी हा शिक्षेचा आदेश दिला.

या प्रकरणातील आरोपी गोपाळ मारुती कुंमदाळे (वय ४९, व्यवसाय मेंढीपालन, रा. कुमठा, ता. उदगीर) याच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम २९४ व ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी कविता लहू भुते (वय २१, व्यवसाय मजुरी, रा. कुमठा) यांनी फिर्याद दिली होती.

न्यायालयाने दंड प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(२) अन्वये आरोपीला भादंवि कलम २९४ अंतर्गत तीन महिन्यांची साधी कैद, तर कलम ५०६ अंतर्गत १० महिन्यांची साधी कैद सुनावली. दोन्ही शिक्षा एकामागोमाग भोगावयाच्या असल्याचे न्यायालयाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. तसेच दंड प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ नुसार आरोपीला सेट-ऑफचा लाभ देण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार व्यंकटेश गंगाधरराव कुलकर्णी यांनी केला. न्यायालयीन कामकाजासाठी कोर्ट पैरवी अधिकारी शेख व जगताप यांनी काम पाहिले. सरकारी पक्षातर्फे ॲड. ए. एस. कदम यांनी बाजू मांडली.

उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक दिलीप गाडे कार्यरत आहेत.

**प्रलयंकारी धक्का..**
**पान ०३ वर**

## हेल्मेट वापराला प्रोत्साहन द्या; मात्र दंडात्मक सक्तीपूर्वी अहमदपूरची स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन जनजागृती व प्रबोधनाला संधी द्या! : डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी

**अहमदपूर/प्रतिनिधी:** लातूर पोलिसांनी दि. १ सप्टेंबर २०२६ पासून हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी करण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर अहमदपूर शहर व तालुक्यात हेल्मेट सक्तीची तातडीने सरसकट दंडात्मक अंमलबजावणी न करता, स्थानिक परिस्थितीचा विचार करून प्रथम जनजागृती, प्रबोधन व समुपदेशनाच्या माध्यमातून हेल्मेट वापरास प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी सम्राट मित्रमंडळ-लातूर अहमदपूरच्या वतीने युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यासंदर्भात पोलीस अधीक्षक, लातूर, उपविभागीय पोलीस अधिकारी, अहमदपूर तसेच पोलीस निरीक्षक,पोलीस स्टेशन अहमदपूर यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात पूढे म्हटले आहे की,रस्ते अपघातांमध्ये जीवितहानी टाळण्यासाठी हेल्मेट वापर अत्यंत महत्त्वाचा आहे, याबाबत आमचा पूर्ण पाठिंबा आहे. मात्र अहमदपूर हे ग्रामीण व शहरी भागाला जोडणारे शिक्षण, व्यापार व प्रशासकीय केंद्र असून तालुक्यातील अनेक गावांमधून विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर, कामगार, छोटे व्यावसायिक व नागरिक दररोज दुचाकीवरून शहरात ये-जा करतात. अनेक कुटुंबांमध्ये एकाच दुचाकीचा वापर घरातील अनेक सदस्य करीत असल्याने प्रत्येकासाठी स्वतंत्र हेल्मेट घेणे काही कुटुंबांवर आर्थिक भार ठरू शकतो. हेल्मेट सक्ती नको; जनजागृती व प्रबोधनातून सुरक्षिततेसाठी प्रोत्साहन द्या, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.हेल्मेटची गुणवत्ता, योग्य दरात उपलब्धता, ग्रामीण भागातील नागरिकांची आर्थिक परिस्थिती, विद्यार्थ्यांच्या अडचणी, सार्वजनिक वाहतुकीची मर्यादित उपलब्धता तसेच शहरातील वाहतूक व्यवस्था या बाबींचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

केवळ हेल्मेट सक्ती करून अपघातांची समस्या पूर्णपणे सुटणार नसून रस्त्यांवरील खड्डे, अपुरी प्रकाशव्यवस्था, बेदरकार वाहनचालन, अल्पवयीनांकडून वाहन चालविणे, मद्यप्राशन करून वाहन चालविणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि अपघातप्रवण ठिकाणे यावरही प्रभावी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

पोलिस प्रशासनाने सुरुवातीच्या काळात दंडात्मक कारवाईपेक्षा समुपदेशन व जनजागृती अभियान राबवावे, शाळा-महाविद्यालये, ग्रामपंचायती, बाजारपेठा व सामाजिक संस्थांच्या माध्यमातून व्यापक प्रबोधन करावे आणि त्यानंतर स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून पुढील अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

सुरक्षिततेच्या उद्देशाला आमचा पूर्ण पाठिंबा आहे; मात्र सुरक्षितता साध्य करण्यासाठी सक्तीपेक्षा जनजागृती, प्रबोधन आणि स्थानिक परिस्थितीनुसार अंमलबजावणी अधिक प्रभावी ठरेल, असे डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी सांगितले.

### प्रभात किरणे

लवकर झोपावे लवकर उठावे
सूर्यमुख दर्शन रोज रोज घ्यावे
कोवळे सोनेरी ऊन रोज खावे
रत्न डी जीवनसत्व रोज घ्यावे

**- इंजि. नागनाथ कलवले**
9764788288

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**नेपाळनंतर आता चीन हादरलं, भूकंपाने जमिनच डगमगली...**

### चिमटा दयाचा



हेल्मेट वापराची सुरवात होणार आहे!
सुरक्षितेसाठी काळजी घेतली जात आहे !!
शक्यतो हेल्मेट वापरण्याची सवय लावुन घेण्याची गरज आहे !!!

## औराद ग्रामीण रुग्णालयाच्या दारातच रोहित्राने घेतला पेट

### कर्मचाऱ्यांच्या सर्तकतेमुळे मोठा अनर्थ टळला

**औराद शहाजानी/प्रतिनिधी:** येथील ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीसमोरील विद्युत रोहित्राला सोमवारी अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. रोहित्रातून मोठ्या प्रमाणात धूर निघू लागल्यानंतर काही क्षणांतच आगीच्या ज्वाळा भडकल्या. रुग्णालयाच्या संरक्षण भिंतीलगतच ही घटना घडल्याने मोठ्या दुर्घटनेची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, नागरिक, रुग्णालयीन कर्मचारी व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी वेळीच धाव घेतल्याने अनर्थ टळला.

ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मुख्य रस्त्यालगत हे रोहित्र असल्याने परिसरात दिवसभर मोठी वर्दळ असते. रुग्ण, त्यांचे नातेवाईक, महिला, वृद्ध तसेच नागरिकांची सतत ये-जा सुरू असते. अशा ठिकाणी रोहित्राला आग लागल्याने काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच ग्रामपंचायत कर्मचारी शेखर कांबळे, चंद्रशेखर भंडारे, रुग्णालयातील डॉक्टर, सुरक्षा रक्षक तसेच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याने संभाव्य मोठा धोका टळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.



## महिला सक्षमीकरणाचा 'औसा पॅटर्न' आता संपूर्ण महाराष्ट्रासाठी नवा आदर्श!

### – आमदार अभिमन्यु पवार यांच्या पाठपुराव्याला यश

**औसा प्रतिनिधी/परवेज शेख:** महिला सक्षमीकरणाचा 'औसा पॅटर्न' आता प्रत्यक्षात आकार घेतोय! गावोगावी मेहनतीने उभा राहिलेल्या महिला बचत गटांच्या स्वावलंबनाला आता मिळतीय स्वतःची आणि हक्काची जागा. औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांची संकल्पना आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली 'महिला अस्मिता भवन' ची उभारणी प्रत्यक्ष साकार होत आहे. अनेक ठिकाणी याचे भूमिपूजन पार पडले असून कामे वेगाने सुरू आहेत. पहिल्याच टप्प्यात औसा मतदारसंघातील ४० गावांमध्ये या भवनासाठी तब्बल १६ कोटी ८८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.





या अस्मिता भवनात असणार आहे - महिलांच्या बैठका आणि प्रशिक्षणासाठी सुसज्ज हॉल,बचत गटांसाठी हक्काचे कार्यालय, आणि उत्पादनांच्या विक्रीसाठी सुसज्ज गाळे! म्हणजेच महिलांना एकाच छताखाली बाजारपेठ आणि स्वावलंबनाची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. गरज ओळखायची, संकल्पना मांडायची आणि तिचा सतत पाठपुरावा करून ती प्रत्यक्षात उतरवायची... हीच तर आमदार अभिमन्यू पवार यांची खरी ओळख आहे! शेतरस्त्यांनंतर आता बचत गटांना बळकट करणारा हा 'औसा पॅटर्न' संपूर्ण महाराष्ट्रासाठी महिला सक्षमीकरणाची नवी दिशा ठरत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पूर आणि भुकंप विनाशकारीच...

जगात दोन बाबी खतरनाक समजल्या जातात, एक पुर व दुसरा भुकंप! हे दोन संकटे आल्यास मोठी समस्या निर्माण होते, ती सोडविण्यासाठी अनेक काळ जातो. तरी झालेली हानी भरून काढणे अशक्य होते. अनेक समस्या निर्माण होतात. नुकताच नेपाळ आणि तिबेटच्या बॉर्डरवरील शक्तीशाली भूकंपानंतर भूस्खलन झाले. त्यानंतर नेपाळमधील रुसवा जिल्ह्यात मोठा पूर आला. भोटे कोसी नदीला आलेल्या या भयानक पुरात अनेक लोक वाहून गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. आता मृत्यांचा आकडा हा शेकडोमध्ये असला तरी तो आकडा वाढू शकतो अशी शंका जाणकार व्यक्त करत आहेत. चीन आणि नेपाळच्या बॉर्डरवरील या नैसर्गिक थैमानाचे आता नवीन बाब समोर येत आहे. यानंतर जगभरातील अशा मोठ्या दुर्घटनांबाबत चर्चा सुरू झाली आहे. अशाच जगभरात ५ मोठ्या दुर्घटना घडल्या आहेत. त्या अशा आहेत. ज्यात नद्यांना अचानक पूर आला आहे किंवा धरणे फुटण्याची घटना घडली आहे. चीनमध्ये १९७५ मध्ये बानिकियाओ धरण दुर्घटना घडली होती. त्यात जवळपास ६२ छोटी धरणे एकापाठोपाठ एक फुटली होती. १९७५ मध्ये चीनमध्ये आलेल्या 'नीना' चक्रीवादळामुळे सलग मुसळधार पाऊस झाला. डोंगरावरून येणाऱ्या पाण्याच्या प्रचंड दाबाने बानकियाओ धरण आणि त्याखालची सुमारे ६२ छोटी धरणे एकापाठोपाठ एक फुटली. यातून बाहेर पडलेल्या पाण्याच्या लाटेने संपूर्ण शहरे आणि गावे उद्ध्वस्त केली. या महाभयंकर आपत्तीत सुमारे १ लाख ७१ हजार ते २ लाख लोकांचा मृत्यू झाला. जगातील ही सर्वात मोठी धरण दुर्घटना मानली जाते. जून २०१३ मध्ये उत्तराखंडमध्ये झालेली ढगफुटी आणि त्यानंतर चोराबरी हिमनदीचा (ग्लेशियर) तलाव फुटल्याने डोंगरावरून पाण्याचा आणि चिखलाचा प्रचंड लोंढा खाली आला. या फ्लॅश फ्लडने मंदाकिनी नदीच्या खोऱ्यात हाहाकार उडवला. केदारनाथ मंदिर परिसर, रस्ते आणि आजूबाजूची गावे पूर्णपणे वाहून गेली. या नैसर्गिक आपत्तीत ६,००० हून अधिक लोकांचा बळी गेला. सप्टेंबर २०२३ मध्ये 'डॅनियल' चक्रीवादळामुळे लिबियामध्ये विक्रमी पाऊस झाला. डोंगरावरून आलेल्या पाण्याच्या प्रचंड दाबाने डर्ना शहराजवळील दोन धरणे फुटली. डोंगरावरून खाली आलेल्या या पुराच्या पाण्याने थेट शहरात प्रवेश केला आणि डर्ना शहराचा एक चतुर्थांश भाग थेट समुद्रात वाहून नेला. या भीषण दुर्घटनेत ११,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि हजारो लोक बेपत्ता झाले. १९६३ मध्ये इटलीतील वजोंट धरणाच्या जलाशयात डोंगराचा एक महाकाय कडा अचानक कोसळला. डोंगर पाण्यात पडल्यामुळे धरणात ८२० फूट उंच पाण्याची महाकाय लाट निर्माण झाली. हे पाणी धरणाच्या भिंतीवरून ओसंडून खाली असलेल्या लोंगारोन आणि इतर गावांवर कोसळले. अवघ्या काही मिनिटांत सर्व गावे नष्ट झाली आणि सुमारे २,००० लोकांचा जागीच मृत्यू झाला. अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात विध्वंसक घटनांपैकी एक. सलग मुसळधार पावसामुळे पेनसिल्व्हेनियामधील 'साऊथ फोर्क धरण' फुटले. या धरणातून सुमारे दोन कोटी टन पाणी एका अरुंद दरीतून ताशी ६४ किलोमीटर वेगाने डोंगरावरून खाली असलेल्या जॉनस्टाऊन शहरात घुसले. या पाण्याच्या भिंतीने वाटेत आलेले सर्व काही उद्ध्वस्त केले आणि यात २,२०९ लोकांनी प्राण गमावले. अशा घटने वरून भुकंप असो किंवा पूराचा तडाखा हा भयंकर व विध्वंसक ठरतो हे मान्यच केले पाहिजे. आज नेपाळला झळ बसली ती चीनकडून चीनने वेळीच सावधगिरीचा इशारा दिला असता तर मनुष्य हानी टाळता आली असती. एनवेळा जर असे संकट आले तर काहीच करता येवू शकत नाही. त्यामुळे सतर्कता ही महत्वाची आहे. नेपाळमध्ये पुरामुळे विध्वंसक निर्माण झाला याला जबाबदार चीन असल्याचा आरोप होत आहे. यात किती सत्यता आहे हे पहाणे आवश्यक आहे. चीन तसा महाकाय आहे. चीनचा डाव मोठा आहे. तो नेपाळच काय भारताच्या सीमेलगत येवून भारताला शह देण्याचा प्रयत्न करीत आहे. भारत आणि नेपाळशी मैत्रीचे संबंध आहेत. भारतीय मंडळी नेपाळला सतत मोठ्या प्रमाणात भेटी देत असतात. त्यामुळे पुराच्या संकटात इतर देशापेक्षा भारतीय आडकल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे भारताकडून अनेक प्रयत्न सुरु केले आहेत. वास्तविक भारताने नेपाळला सर्वप्रकारची मदतीचे आश्वासन दिले आहे. शेजारी धर्म निभावला पाहिजे. भारताकडून आरोग्य सुविधा दिल्या गेल्या आहेत. अनेक सेवाभावी संस्थांना पाठविण्याची गरज आहे. पुराच्या मोठ्या संकटात नेपाळ आडकला आहे. त्याला जेवढी मदत करता येईल तेवढी भारताने केली पाहिजे. मदतीच्या माध्यमातून कोणत्याही परिस्थितीत चीनला नेपाळ मध्ये घुसू न देणे ही भारताची जबाबदारी आहे. चीन धुर्त राष्ट्र आहे. मदतीच्या नावाखाली तो नेपाळींना आपलेसे करू शकतो. आपले पाय नेपाळमध्ये रोवू शकतो. काही झाले तरी चीनचा शिरकाव नेपाळमध्ये होता कामा नये. नेपाळवर पुराचे संकट ओढावले आहे. ते दूर करता येईल. पुरपरिस्थिती सुधारल्यानंतर तेथे मोठ्या प्रमाणात रोगराई निर्माण होण्याची शक्यता असते. ती नियंत्रणात आणणे आवश्यक आहे. काही झाले तरी भारताने मोठ्या मनाने नेपाळला सर्वोपरी मदत केली पाहिजे. नेपाळला मदत करणे म्हणजे चीनला भारताजवळ येण्यास रोखणे असा होतो. त्यामुळे भारताने दूरदृष्टीठेवून चालणे आवश्यक आहे. चीनची खेकडीचाल ओळखली पाहिजे. चीनचा लाड केल्याने त्याचे भोग भोगत आहोत. भाई-भाईचा नारा पंडित नेहरू यांनी दिला होताच. चीनपायी आपण माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांना गमावले आहे. चीनमुळे अनेक नुकसान झाले. आजही चीन भारताला सतावत आहे. गलवान खोरे असो किंवा अन्य सीमावर्ती भागात रस्ते निर्माण करणे. सैनिकासाठी घरे तयार करणे. मोठे धरण बांधणे चालू आहे. धरण फोडल्यास काय होते ते त्यांना माहिती आहे. त्यामुळे भारताने मोठ्या प्रमाणात नेपाळला मदत करावी. सर्वोपरी मदत करावी. ही मदत वाया जाणार नाही. दुष्मनराष्ट्र चीनला चपराक आहे. त्यामुळे भारताने मदतीसाठी पुढे आले पाहिजे हा फायदा सौदा फायद्याचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

# नेत्रदान : अ गिफ्ट ऑफ व्हिजन



भारतीय संस्कृतीत दानाला सर्वात मोठे स्थान आहे.मग ते रक्तदान,भूदान, कन्यादान किंवा अन्नदान असो.या विविध मार्गाने मनुष्य दानधर्म करून पुण्य कमावण्याचा प्रयत्न करतो.कारण मृत्यूनंतर पैसा,संपत्ती यापैकी काहीही सोबत येणारे नसते. सोबत येणारे असते ते फक्त आपण केलेले पुण्यकर्म. हा झाला अध्यात्मिक बाबतीतला विचार. परंतु यापेक्षा सर्वश्रेष्ठ म्हणता येईल, असे एखादे माणुसकीच्या दृष्टीने दान असू शकते का तर होय! ते म्हणजे नेत्रदान होय.कारण एका व्यक्तीच्या नेत्रदानातून दोन व्यक्तींना दृष्टी देण्याची किमया फक्त नेत्रदानात आहे. परंतु नेत्रदान जरी पुण्यकर्म असले तरी याबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोनाचा मोठा अभाव दिसून येतो.सद्य:स्थितीत नेत्रदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन व जनजागृती वाढविण्यासाठी शासन तसेच काही सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत.येणाऱ्या काळात नेत्रदानाबाबत संपूर्ण समाजात सकारात्मक दृष्टिकोनातून जनजागृती नक्कीच होईल.याचाच एक भाग म्हणजे भारत सरकार,महाराष्ट्र शासन व सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान व राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत दरवर्षी संपूर्ण भारतात दि.२५ ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर या कालावधीत राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा साजरा करण्यात येतो.यावर्षीही हा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. समाजातील बुबुळजन्य आजारामुळे आलेल्या अंधत्वाची समस्या पाहता मृत्यूनंतर नेत्रदानाचे प्रमाण वाढावे, हा त्यामागील उद्देश आहे.त्याकरिता या कालावधीत विविध माध्यमांतून समाजात नेत्रदानाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.संस्कृतमध्ये असे म्हटले जाते,'सर्व इन्द्रियाणां नयनं प्रधानम्', म्हणजे शरीरातील सर्व इंद्रियांमध्ये डोळ्याचे स्थान प्रथम आहे.यातूनच डोळा किंवा नेत्र हा मानवी शरीरातील किती महत्त्वाचा भाग आहे,हे समजून येते.

**अंधत्वाची सद्य:स्थिती**

सध्या भारतामध्ये १.२५ कोटीच्या आसपास लोक दृष्टीहीन असून, त्यापैकी पारदर्शक पटल (ऊीपशर) च्या बुबुळजन्य आजारामुळे (ऊीपशरश्र इश्रळपवपर्शीी) अंदाजे ६५ लाख लोकांना अंधत्व आलेले आहे.असे आलेले अंधत्व साध्या सरळ नेत्रदानातून प्राप्त नेत्रबुबुळ प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियेने दूर होऊ शकते.याकरिता मरणोत्तर नेत्रदानातून दरवर्षी १ लाख पारदर्शक नेत्रबुबुळांची आवश्यकता असते. परंतु वर्षाकाठी केवळ २५ ते ३० हजार डोळे मरणोत्तर नेत्रदानातून प्राप्त होतात.त्यापैकी ८ ते ९ हजार डोळे अंधावर शस्त्रक्रिया करण्यासाठी योग्य असतात. नेत्ररोपणाकरिता दरवर्षी एक लाखाहून अधिक बुबुळांची गरज असते. परंतु एकूण दरवर्षी होणाऱ्या मृत्यूच्या प्रमाणात मरणोत्तर नेत्रदानातून प्राप्त होणाऱ्या बुबुळांचे प्रमाण अगदी अत्यल्प आहे.

**बुबुळजन्य आजारामुळे अंधत्व : कारणे**

अंधत्व हे केवळ मोतीबिंदूमुळे येते असे नाही,तर डोळ्यांना होणाऱ्या विविध आजारांमुळेही अंधत्व येऊ शकते. बुबुळ हे पारदर्शक पटल असून ते अपारदर्शक होणे हा आजार कोणत्याही वयाच्या व्यक्तीला, म्हणजेच लहान मुलापासून ते मोठ्या माणसापर्यंत कोणालाही होऊ शकतो. उदा. अपघातामध्ये डोळ्याला मार लागणे, डोळे येणे,अ जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे व्हायरल इन्फेक्शन,डोळ्यात रासायनिक पदार्थ जाणे तसेच डोळ्याची एखादी शस्त्रक्रिया केल्यानंतर गुंतागुंत निर्माण होणे अशा व इतर कारणांमुळे देखील बुबुळ खराब होऊ शकते.अशावेळी योग्य वेळी तपासण्या व निदान करून बुबुळ शस्त्रक्रियेद्वारे प्रत्यारोपण करून घेतल्यास आलेले अंधत्व टाळता येऊ शकते.

**नेत्रदान म्हणजे काय**

नेत्रदान म्हणजे आपल्या मृत्यूनंतर स्वत:चे डोळे इतर अंध व्यक्तीकरिता दान करणे होय.यासाठी आपले मरणोत्तर नेत्रदान संमतीपत्र भरून आपल्या व नातेवाईकाच्या स्वाक्षरीने जवळच्या आरोग्य केंद्रामध्ये किंवा नेत्रपेढीमध्ये जमा करावे.मृत्यूनंतर नेत्रदान म्हणजे स्वत:च्या इच्छेने नेत्रदान करून महान सामाजिक कार्य करणे होय. एखाद्या व्यक्तीने जिवंतपणी आपले संमतीपत्र भरले नसेल,तरीही त्यांच्या नातेवाईकांच्या संमतीने नेत्रदान केले जाऊ शकते. मरणोत्तर नेत्रदान करून अंध व्यक्तीच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचे पवित्र काम आपण करू शकतो.आपल्या मृत्यूनंतर आपल्या डोळ्यांचा उपयोग दुसऱ्या अंध व्यक्तींना जग पाहण्यासाठी होत असेल,तर जगाचा निरोप घेताना आपल्या डोळ्यांची दोन अंध व्यक्तींना दृष्टीची अमूल्य व पवित्र भेट नेत्रदानाने देऊ शकतो.

भारतामध्ये मरणोत्तर नेत्रदानाचे प्रमाण इतर देशांच्या तुलनेत खूप कमी आहे. चीन,जपान,श्रीलंका या देशांमध्ये शरीराच्या प्रत्येक अवयवाचे दान करण्याची प्रथा आहे.जगात नेत्रदानासाठी श्रीलंका हा देश आघाडीवर आहे.तेथे मृत व्यक्तीचे नेत्र ही राष्ट्रीय संपत्ती मानून नेत्रदान केले जाते.त्यामुळे आजच्या स्थितीत श्रीलंकेसारखा छोटा देश संपूर्ण जगाला नेत्रबुबुळ पुरवठा करतो.श्रीलंकेसारख्या देशातील लोकांप्रमाणे भारतातही स्वयं-स्फूर्तपणे नेत्रदानाचे कार्य वाढविणे ही काळाची गरज आहे.परंतु आजही अंधश्रद्धेपायी नेत्रदान पाहिजे तेवढ्या प्रमाणात होत नाही.

**नेत्रदान कोण करू शकते**

ज्या व्यक्तीचे बुबुळ चांगले आहे,अशी व्यक्ती नेत्रदान करू शकते. तसेच मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेली व्यक्तीही नेत्रदान करू शकते. काचबिंदू किंवा चष्म्याचा मोठा नंबर असला तरीही ती व्यक्ती नेत्रदान करू शकते.नेत्रदान करण्यासाठी वयाचे बंधन नाही.एक वर्षाचे बालक ते अतिवृद्ध व्यक्ती देखील मरणोत्तर नेत्रदान करू शकते.

**नेत्रदान कोणास करता येत नाही**

मृत्यूनंतर नेत्रदान ज्या व्यक्तीचा मृत्यू हा संसर्गजन्य आजार,रेबीज, कावीळ, कॅन्सर,एड्स,कुष्ठरोग,क्षयरोग, सेप्टीसेमिया, गँगरीन,विषबाधा,सर्पदंश अशा कारणांमुळे झाला असेल,तर अशा व्यक्तीचे नेत्रदान करता येत नाही.परंतु अशा डोळ्यांचा उपयोग प्रत्यारोपणाऐवजी संशोधन, प्रशिक्षण करण्यासाठी व वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी होऊ शकतो.

**नेत्रदानाबाबतचे गैरसमज व अडचणी**

'नेत्रदान धर्मविरोधी कृत्य आहे', 'नेत्रदान म्हणजे जिवंतपणी नेत्र काढले जातात का', 'नेत्रदान केल्यामुळे मृत व्यक्तीचा चेहरा विद्रूप दिसेल','पुढच्या जन्मात अंध म्हणून जन्माला येण्याची भीती' अशा अंधश्रद्धा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे योग्य जाणीव-जागृती व सकारात्मक दृष्टिकोन नसणे,यामुळे नेत्रदानाच्या चळवळीसमोर अडचणी आहेत. असे असले तरीही सर्व धर्मांनी मरणोत्तर नेत्रदानाला पवित्र मानून त्याचे समर्थनच केलेले आहे.

नेत्रदान करण्यासाठी आपण काय करू शकतो कोणत्याही व्यक्तीस मरणोत्तर नेत्रदान करण्याची इच्छा असल्यास नजीकच्या शासकीय रुग्णालयाच्या नेत्रविभागात मरणोत्तर नेत्रदानाचे संमतीपत्र भरून द्यावे.संमतीपत्र भरले नसले आणि मृत व्यक्तीच्या नातेवाईकांची इच्छा असल्यास त्यांच्या संमतीने मृत व्यक्तीचे नेत्रदान लगेचच करता येते.यासाठी १० ते १५ मिनिटांचा कालावधी लागतो.

**नेत्रदान करण्यासाठी कोणती काळजी घेणे आवश्यक आहे**

मृत्यूनंतर मृत व्यक्तीचे डोळे लगेच बंद करावेत.डोळ्यांवर स्वच्छ ओले कापड ठेवावे.खोलीत पंखा असेल तर तो बंद करावा व ए.सी.असेल तर चालू करावा. डोक्याखाली उशी ठेवावी.मृत्यूनंतर जवळच्या नेत्रपेढीला फोन करावा. मृत्यूनंतर ४ ते ६ तासांच्या आत डोळे काढल्यास ते प्रत्यारोपणासाठी उपयोगी येऊ शकतात.

एखाद्याला आजन्म अंधारात जगू देण्यापेक्षा मरणोत्तर नेत्रदान करून त्यांना निसर्गाची ही किमया पाहण्याची संधी देणे,आपल्या नेत्रदानामुळे जर दोन अंध व्यक्तींना ही सृष्टी पाहता येत असेल,तर यापेक्षा दुसरे पुण्याचे काम नाही. अंधत्वाच्या तुलनेत नेत्रदानाचे प्रमाण अतिशय नगण्य आहे. अंधश्रद्धेच्या नादी लागून नेत्रदानासारख्या पवित्र गोष्टीपासून दूर राहू नका.आपल्या मृत्यूनंतरही आपण नेत्ररूपी अनेक वर्षे जिवंत राहतो, ही गोष्ट प्रत्येकाने लक्षात घ्यावी.

समाजातील अंधत्व आलेल्या व्यक्तींना सुंदर सृष्टी पाहता यावी व अंधांच्या अंधकारमय आयुष्यात प्रकाश आणावयाचा असल्यास नेत्रदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी प्रत्येक भारतीयाने सकारात्मकपणे नेत्रदान चळवळीत पुढाकार घेऊन सहकार्य करणे आवश्यक आहे.

**- डॉ.धनंजय चाकुरकर**
**जिल्हा शल्यचिकित्सक**
**धाराशिव**

**आपले नेत्रदान - दोन व्यक्तींना दृष्टीदान !**

# लेक लाडकी योजनेत मुंबईतील ३ हजार ५६३ लाभार्थींना मिळणार लाभ

**मुंबई/प्रतिनिधी:** मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देऊन मुलींचा जन्मदर वाढविणे, त्यांच्या शिक्षणास चालना देणे, मुलींचा मृत्यू दर कमी करणे व बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे, शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी, शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी राज्य शासन 'लेक लाडकी योजना' राबवित आहे. या योजनेअंतर्गत मुंबई शहरातील ६७१ आणि मुंबई उपनगरातील २ हजार ८९२ अशा एकूण ३ हजार ५६३ लाभार्थींना लाभ देण्यात येणार आहे.

माझी कन्या भाग्यश्री (सुधारित) ही योजना अधिक्रमित करुन राज्यात १ एप्रिल २०२३ पासून मुलींच्या जन्मानंतरच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजना सुरु करण्यात आली आहे. ही योजना पिवळ्या किंवा केशरी शिधापत्रिका धारक कुटुंबामध्ये १ एप्रिल २०२३ रोजी वा तद्नंतर जन्मलेल्या मुलींकरिता लागू आहे. तसेच लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम एक लाखापेक्षा अधिक नसावे.

आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या कुटुंबांतील मुलींना शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी या योजनेतून टप्प्याटप्प्याने एकूण एक लाख एक हजार रुपयांचा लाभ देण्यात येतो. मुलीच्या जन्मानंतर पाच हजार रुपये, इयत्ता पहिलीत प्रवेश घेतल्यानंतर सहा हजार रुपये, इयत्ता सहावीत प्रवेशानंतर सात हजार रुपये आणि इयत्ता अकरावीत प्रवेशानंतर आठ हजार रुपये दिले जातात. मुलीने वयाची १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर ७५ हजार रुपयांचा अंतिम लाभ देण्यात येतो. पहिल्या अपत्याच्या तिसऱ्या हप्त्यासाठी आणि दुसऱ्या अपत्याच्या दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज करताना कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अंतिम लाभ मिळण्यासाठी मुलीने १८ वर्षे पूर्ण केलेली आणि ती अविवाहित असणे आवश्यक आहे.

१ एप्रिल २०२३ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेल्या एक अथवा दोन मुलींना योजनेचा लाभ लागू आहे. कुटुंबात एक मुलगा आणि एक मुलगी असल्यास मुलगी या लाभासाठी पात्र राहील. कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणे आवश्यक आहे.

पात्र मुलींच्या पालकांनी जन्मनोंदणी व जन्मदाखल्यासह आपल्या कार्यक्षेत्रातील अंगणवाडी सेविकेशी संपर्क साधावा. आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका किंवा मुख्य सेविका यांच्यामार्फत पात्रता आणि कागदपत्रांची पडताळणी केली जाते. लाभार्थींची माहिती ऑनलाइन प्रणालीत नोंदवून संबंधित स्तरावर प्रमाणित झाल्यानंतर नियमानुसार टप्प्याटप्प्याने आर्थिक लाभ दिला जातो.

अर्जासाठी मुलीचा जन्मदाखला, पालकांचे व लाभार्थी मुलीचे आधार कार्ड, पिवळे अथवा केशरी शिधापत्रिका, कुटुंबप्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला, लाभार्थी किंवा पालकांच्या बँक पासबुकची प्रत आणि संबंधित टप्प्यासाठी शाळेचा बोनाफाईड दाखला आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार कुटुंब नियोजन प्रमाणपत्र, अंतिम लाभासाठी मुलगी अविवाहित असल्याचे स्वयंघोषणापत्र तसेच शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेली अन्य कागदपत्रेही सादर करावी लागतील. पात्र लाभार्थी योजनेपासून वंचित राहू नयेत यासाठी अंगणवाडी सेविका व मदतनीस मार्गदर्शन आणि सहकार्य करीत आहेत.

अधिक माहितीसाठी https://icds.gov.in/en/schemes/lek-ladki-yojana

# दोन दिवसांच्या घसरणीला ब्रेक! 'या' कारणामुळे सेन्सेक्स ३३१ अंकांनी वधारला; निफ्टीही तेजीत

भारतीय शेअर बाजाराने शुक्रवारी सलग दोन दिवसांच्या घसरणीला ब्रेक दिला. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांच्या शेअर्समध्ये झालेल्या खरेदीमुळे तसेच जागतिक बाजारातील सकारात्मक वातावरणाचा फायदा मिळाल्याने सेन्सेक्स आणि निफ्टी तेजीसह बंद झाले.

३० शेअर्सचा सेन्सेक्स ३३०.९२ अंकांनी (०.४३ टक्के) वाढून ७७,२६४.५१ अंकांवर स्थिरावला. दिवसभरात सेन्सेक्सने ४२४.३८ अंकांची उसळी घेत ७७,३५७.९७ अंकांची उच्चांकी पातळी गाठली. तर निफ्टी ८४.८० अंकांनी (०.३५ टक्के) वाढून २४,१७५.६५ अंकांवर बंद झाला.

सेन्सेक्समधील कंपन्यांमध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, इन्फोसिस, टेक महिंद्रा, एचसीएल टेक, टायटन आणि इटर्नल यांच्या शेअर्समध्ये चांगली वाढ झाली. दुसरीकडे आयसीआयसीआय बँक, अल्ट्राटेक सिमेंट, एशियन पेंट्स आणि आयटीसी हे शेअर्स घसरणारे प्रमुख ठरले.

जागतिक बाजारातही संमिश्र स्थिती पाहायला मिळाली. दक्षिण कोरियाचा कोस्पी आणि चीनचा शांघाय एसएसई कम्पोझिट निर्देशांक घसरणीसह बंद झाले. मात्र, जपानचा निक्केई २२५ आणि हाँगकाँगचा हँग सेंग निर्देशांक तेजीत राहिला. युरोपीय बाजार सकारात्मक पातळीवर व्यवहार करत होते, तर अमेरिकेतील बाजार गुरुवारी वाढीसह बंद झाले.

**दरम्यान, ब्रेंट क्रूडचा भाव ०.१७ टक्क्यांनी घसरून ८९.६३ डॉलर प्रति बॅरल झाला**

जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांच्या मते, खढ शेअर्समधील मजबूत खरेदीमुळे भारतीय बाजाराला आधार मिळाला. एनव्हिडिया च्या मजबूत निकालांमुळे आणि सकारात्मक अंदाजामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील गुंतवणुकीबाबत आशावाद वाढला असून, त्याचा फायदा एंटरप्राइज आणि वर्कफ्लो इंटिग्रेशनशी संबंधित कंपन्यांना झाला.

मात्र, अमेरिकेच्या व्याजदराच्या पुढील दिशेबाबत गुंतवणूकदारांचे लक्ष फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जॅक्सन होल परिसंवादातील भाषणाकडे लागले आहे. त्यामुळे बाजारातील गुंतवणूक मर्यादित आणि निवडक राहिली.

दरम्यान, गुरुवारी विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून २९८.२६ कोटी रुपयांची निव्वळ विक्री केली होती. गुरुवारी सेन्सेक्स ५३९.३५ अंकांनी, तर निफ्टी ११६.९० अंकांनी घसरला होता.

******

# विदेशी गुंतवणूकदारांची भारतात पुन्हा एन्ट्री; ऑगस्टमध्ये २७,१८६ कोटींची गुंतवणूक, २३ महिन्यांचा विक्रम

भारतीय शेअर बाजारात विदेशी गुंतवणूकदारांचा पुन्हा विश्वास वाढताना दिसत आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये आतापर्यंत विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर्समध्ये तब्बल २७,१८६ कोटी, म्हणजेच सुमारे २.८५ अब्ज डॉलरची निव्वळ गुंतवणूक केली आहे. सलग दुसऱ्या महिन्यात ऋझख भारतीय बाजारात निव्वळ खरेदीदार ठरले आहेत.

नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या आकडेवारीनुसार, ऑगस्टमधील गुंतवणूक सप्टेंबर २०२४ नंतरची सर्वाधिक मासिक ऋझख गुंतवणूक आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात ५७,७२४ कोटींची गुंतवणूक केली होती. यापूर्वी जुलै २०२६ मध्ये FPI ने २०,२०० कोटींचे शेअर्स खरेदी केले होते.

**मिडकॅप-स्मॉलकॅपवर विदेशी गुंतवणूकदारांचा भर -**

२५ ऑगस्टपर्यंतच्या एकूण २७,१८६ कोटींच्या गुंतवणुकीपैकी १५,४९१ कोटी शेअर बाजारातून आली आहे. तर ११,६९४ कोटी प्राथमिक बाजार आणि इतर श्रेणींमधून गुंतवले गेले आहेत.

बजाज अल्ट्सचे CIO-लिस्टेड इक्विटीज जितेंद्र गोहिल यांच्या मते, जागतिक बाजारातील बदल भारताकडे विदेशी गुंतवणूकदारांचा ओढा वाढण्यामागे महत्त्वाचा घटक आहे. कोरिया आणि तैवानमधील AI व चिप कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी गुंतवणूक झाल्याने तेथील काही शेअर्सचे मूल्यांकन महाग झाले आहे. त्यामुळे विदेशी गुंतवणूकदार इतर उदयोन्मुख बाजारांमध्ये संधी शोधत असून भारत तुलनेने सुरक्षित पर्याय म्हणून समोर येत आहे.

जियोजित इन्व्हेस्टमेंट्सचे मुख्य गुंतवणूक धोरणकार व्ही. के. विजयकुमार यांच्या मते, FPI मोठ्या बँकिंग आणि खढ कंपन्यांऐवजी निवडक मिडकॅप शेअर्समध्ये खरेदी करत आहेत. ऑगस्टमध्ये २७ तारखेपर्यंत मिडकॅप निर्देशांक १.८३ टक्के, तर स्मॉलकॅप निर्देशांक ३.७ टक्क्यांनी वाढला. याउलट सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये सुमारे एक टक्क्याची घसरण झाली.

**भारताची आर्थिक वाढ ठरवणार पुढची दिशा -**

भारताची आर्थिक वाढ आणि कंपन्यांच्या नफ्यात सुधारणा कायम राहिल्यास विदेशी गुंतवणूक पुढेही वाढू शकते. मात्र, अमेरिकन बॉण्डवरील उच्च उत्पन्नदर हा भारतीय शेअर बाजारासाठी महत्त्वाचा धोका आहे. बॉण्ड यील्ड वाढल्यास विदेशी गुंतवणूकदार जोखमीच्या शेअर्समधून पैसा काढून अमेरिकन बॉण्डकडे वळू शकतात.

मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेसच्या मते, कंपन्यांच्या कमाईत वाढ आणि आर्थिक वाढीचा विस्तार अधिक क्षेत्रांमध्ये झाल्यास भारतीय बाजारातील जोखीम-परतावा समीकरण सुधारू शकते. त्यामुळे भारत विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी अधिक आकर्षक ठरू शकतो.



# प्रलयंकारी धक्का

भूकंप आणि पूर या नैसर्गिक घटना असल्या, तरी त्यामध्ये माणसाचा सहभाग आहे का हे तपासण्याची वेळ आल्याचे नेपाळमधील दुर्घटनेवरून जाणवते. विकास आणि पर्यावरण यातील संतुलन जपणे गरजेचे आहे.

नेपाळमध्ये आलेला पूर भयप्रद आहे. या देशातील तिबेटच्या सीमेलगतच्या भागात पुराने हाहाकार माजवला आहे. दीडशेपेक्षा जास्त जणांचे त्यात बळी गेले आणि शेकडो अजूनही बेपत्ता आहेत. बहुमजली इमारतीदेखील चिखलात बुडाल्या, रस्त्यावरील वाहने वाहून गेली. मृतांमध्ये नेपाळच्या लष्करातील सैनिक, पोलिस, सशस्त्र पोलिस दलाचे कर्मचारी यांची संख्या जास्त असल्याचे कळले आहे. अनेक परदेशी नागरिक मरण पावले किंवा बेपत्ता आहेत. भोते कोशी नदीच्या पुराचा जोर एवढा प्रचंड होता, की त्यात नुवाकोट भागातील किमान बारा जल विद्युत प्रकल्प वाहून गेले. रस्ते, पूल यांचे किती नुकसान झाले ते अजून स्पष्ट झालेले नाही. बर्फ आणि चिखल यामुळे मदत व शोध कार्यात अडथळे येत आहेत. हिमालयाच्या परिसरात गिर्यारोहणासाठी (ट्रेकिंग) आणि कैलास मानसरोवर यात्रेसाठी आलेल्या अनेक परदेशी नागरिकांचा या दुर्घटनेत बळी गेल्याची भीती आहे. अचानक एवढा मोठा पूर का आला याचे कारण अजून पूर्णपणे समजलेले नाही. भारतासह अनेक देशांचे शास्त्रज्ञ ते शोधत आहेत. बुधवारी सकाळी तिबेटमध्ये भूकंप झाला. त्याची तीव्रता ४.९ रिश्टर स्केल एवढी होती. त्यानंतर नदीस पूर आला. त्यामुळे या दोन घटनांमधील संबंध तपासला जात आहे.

पर्यावरणाचा इशारा

राष्ट्रीय दूर संवेदन केंद्र (एनआरएससी) ही भारतीय अवकाश संशोधन संस्थेशी(इस्रो) निगडित असलेली संशोधन संस्था आहे. भारतीय व आंतरराष्ट्रीय उपग्रहांवरून मिळालेल्या माहितीच्या व दृश्यांच्या आधारे या संस्थेतील शास्त्रज्ञांनी पुराने झालेल्या नुकसानीच्या व्यापकतेचा आराखडा तयार केला आहे. पर्वतांच्या उंच भागातील खोलगट भागात बर्फ साठून तयार झालेल्या हिमनदीस 'सिर्क ग्लेशियर' असे म्हटले जाते. भूकंपाच्या धक्क्यामुळे तिबेटमधील पर्वतांच्या उंच भागातील अशा हिमनदीस हादरा बसला आणि ती कोसळली. त्यातून बर्फ आणि दगडांचा 'हिमप्रपात' बनला. हा बर्फ आणि दगड-मातीचा प्रपात दक्षिण तिबेटमधील त्रिशुली नदीत कोसळला. त्याने काही काळ नदीचा प्रवाह अडला आणि नंतर लगेचच अत्यंत वेगाने ते पाणी वाहू लागले. अचानक आलेल्या त्या प्रवाहाने नेपाळमध्ये अकल्पित नुकसान केले. नेपाळच्या रासुवा भागात जमिनीखाली दहा किलोमीटर हा भूकंप झाल्याचे भूगर्भांतर्गत घडामोडींवर लक्ष ठेवणार्या भारतीय संस्थेने सांगितले आहे. हिमालयातील हा भाग भूकंप प्रवण मानला जातो. बर्फ-दगड यांचा हिमप्रपात हेच या पुराचे कारण आहे काय, याचा शोध एक आंतरराष्ट्रीय संस्था आणि तिच्या नेपाळ व चीनमधील भागीदार संस्था घेत आहेत. गेल्या वर्षीही रासुवा भागातच मोठा पूर आला होता. नेपाळ-चीन सीमेवर अजूनही नद्यांचा प्रवाह अडवणारे घटक आहेत, त्यामुळे आणखी एक पूर येण्याची भीती या संस्थांनी व्यक्त केली आहे. भूकंप ही नैसर्गिक घटना आहे. अलीकडे दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएला व कोलंबिया या देशांत मोठे भूकंप झाले. भूगर्भातील हालचालींमुळे संपूर्ण हिमालय पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील मानला जातो. या प्रदेशात धरणे व वीज प्रकल्प उभारणे त्यामुळेच धोकादायक आहे. नेपाळमध्ये वीज निर्मिती मोठ्या प्रमाणावर होते. भारतही नेपाळकडून वीज विकत घेतो; मात्र अशा प्रकल्पांचा पर्यावरणावर होणारा परिणाम तपासणे आवश्यक ठरले आहे. भारत, चीन, नेपाळ आणि भूतान पर्यावरणीयदृष्ट्या एकमेकांना बांधले गेले आहेत, हे नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिसिर खनाल यांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे या देशांनी पर्यावरणाच्या क्षेत्रात सहकार्य वाढवले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे, ते विचारात घ्यावे लागेल. निसर्गावर मानवाचे नियंत्रण नसले तरी त्या-त्या भागातील परिसंस्थेची हानी होणार नाही, त्याचे जतन करणे या कडे लक्ष देणे मानवास भाग आहे हे या दुर्घटनेने दाखवून दिले आहे. नेपाळमधील पूर भारतात, बिहारमध्ये पूर्वी पोचला होता हे लक्षात घेणे आवश्यक आहे. हिमालयातील हिमनद्यांकडे दुर्लक्ष केल्यास काय होते याचा इशारा निसर्गाने दिला आहे.



# मधुमेह असताना लोणचे, पापड आणि चटणी खाणे योग्य का?

मधुमेह किंवा रक्तातील साखर नियंत्रित करण्याचा प्रश्न येतो, तेव्हा सर्वप्रथम भात, चपाती, ब्रेड, मिठाई आणि गोड पेये आठवतात. तथापि, रोजच्या जेवणासोबत कमी प्रमाणात खाल्ले जाणारे लोणचे, पापड आणि चटण्या हे देखील आहाराचा एक भाग आहे. यामुळे हा प्रश्न निर्माण होतो: हे पदार्थ मधुमेहासाठी पूर्णपणे हानिकारक आहेत का? तज्ञांच्या मते, केवळ नावावरून एखाद्या खाद्यपदार्थाला चांगला किंवा वाईट ठरवणे योग्य नाही. त्यातील घटक, प्रमाण आणि सेवनाची पद्धत विचारात घेणे देखील महत्त्वाचे आहे. चला याबद्दल जाणून घेऊया.

लोणच्यामध्ये अतिरिक्त साखर आणि मीठ लपलेले असू शकते

वेगवेगळ्या लोणच्यांच्या पाककृतींमधील घटक बरेच वेगवेगळे असू शकतात. काही तयार लोणच्यांमध्ये चव वाढवण्यासाठी साखर किंवा गोड पदार्थांचा वापर केला जातो. शिवाय, त्यात तेल आणि मिठाचे प्रमाणही जास्त असू शकते. मधुमेही व्यक्तीसाठी अशा लोणच्यांचे नियमित आणि अतिरिक्त सेवन करणे हा चांगला पर्याय मानला जात नाही. घरी लोणचे बनवताना, तुम्ही कमी किंवा साखरविरहित पाककृती आणि मर्यादित प्रमाणात तेल व मीठ वापरू शकता. लोणचे मुख्य जेवण म्हणून नव्हे, तर केवळ चव वाढवण्यासाठी एक लहानसा पदार्थ म्हणून खाण्याचा आनंद मिळतो.

पापड बनवण्याची पद्धत आणि त्यातील कर्बोदके देखील महत्त्वाची

पापड बहुतेकदा डाळी किंवा इतर घटकांपासून बनवले जातात, परंतु त्यातील कर्बोदकांचे प्रमाण प्रकारानुसार बदलू शकते. बाजारात मिळणाऱ्या पापडांमध्ये मीठ आणि इतर घटकांचे प्रमाण जास्त असू शकते. पापड कसे शिजवले जातात हा सर्वात महत्त्वाचा विचार आहे. तळलेल्या पापडांमुळे अतिरिक्त तेल आणि कॅलरीज वाढू शकतात.

म्हणून, जर तुम्ही मधुमेही असाल आणि पापड खात असाल, तर ते मर्यादित प्रमाणात खाणे आणि न तळलेले पर्याय निवडणे उत्तम ठरू शकते.

प्रत्येक चटणी सारखी नसते

हाच नियम चटण्यांनाही लागू होतो. ताजी कोथिंबीर, पुदिना, हिरवी मिरची, लिंबू आणि मसाले वापरून बनवलेल्या चटण्या साधारणपणे कमी प्रमाणात जेवणाचा भाग असू शकतात. तथापि, काही चटण्यांमध्ये गूळ, साखर, गोड सॉस किंवा मोठ्या प्रमाणात गोड फळे असू शकतात. अशा चटण्यांचा रक्तातील साखरेवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. म्हणून, चटणी निवडताना त्यातील घटकांचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

प्रमाण महत्त्वाचे आहे

काही विशिष्ट पदार्थ पूर्णपणे टाळण्याऐवजी, मधुमेहींसाठी संपूर्ण जेवणातील प्रमाण आणि संतुलनावर लक्ष केंद्रित करणे हा अधिक व्यावहारिक दृष्टिकोन असू शकतो. लोणची, पापड आणि चटण्यांना जेवणाचा मुख्य भाग न मानता, जेवणासोबतचे छोटे पदार्थ समजा. पॅकेज केलेले पदार्थ खरेदी करताना, अतिरिक्त साखर, एकूण कर्बोदके आणि सोडियमसाठी लेबल तपासणे उपयुक्त ठरते.

-ङ्डज ठए-ऊ मधुमेही रुग्णांनी पावसाळ्यात या ७ गोष्टी टाळाव्यात

शेवटी, मधुमेहाचे व्यवस्थापन केवळ एका खाद्यपदार्थापुरते मर्यादित नाही. दैनंदिन आहार, अन्नसेवन, शारीरिक हालचाल आणि डॉक्टरांनी सांगितलेली औषधे यांचे पालन करणे महत्त्वाचे आहे. म्हणून, लोणची, पापड किंवा चटण्यांना घाबरण्याऐवजी, तीन गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे अधिक शहाणपणाचे आहे.

अस्वीकरण : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे.या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत लातूर समाचार कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.





## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

**कमी खाण्यापेक्षा कमी वेळा खाल्ल्याने आजारांवर मात**



दिवसातून फक्त दोनवेळा जेवण घेतल्याने त्यावर बऱ्याच प्रमाणावर नियंत्रण ठेवता येतं. तसंच आहारात छोटे-छोटे बदल केल्यानेही त्याचा मोठा फायदा फक्त साडेतीन महिन्यात होतो, असं सांगत डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी ङ्गमाझा कट्टाफ्ठ्र डाएटगप्पा मारल्या.बदलत्या जीवनशैलीमुळे गेल्या काही वर्षात विविध आजारांनी लोकांना ग्रासलं आहे. यात मधुमेह, रक्तदाब, वाढलेलं वजन यासारख्या अनेक आजारांचा समावेश आहे. मात्र दिवसातून फक्त दोनवेळा जेवण घेतल्याने त्यावर बऱ्याच प्रमाणावर नियंत्रण ठेवता येतं.

## २ Joke — विनोद





**शिपाई : खबरदार, एक पाऊल पुढे टाकशील तर...**

**चोर : तर काय करशील?**

**शिपाई : मला चार पावलं पुढं जावं लागेल.**

## ३ Message — संदेश



Doctor: aapke pati ko zyaada rest ki zaroorat hai. yeh sleeping tablets leejiye.
Wife: unko yeh kab dena hai doctor?
Doctor: yeh unke liye nahi, aapke liye hai

## ४ Thought — सुविचार




निष्काम कर्म म्हणजे कर्मत्याग नव्हे.– **भगवद्गीता**

**संस्कृत सुभाषित**

**अद्रोहं सर्वभूतेषु कर्मणा मनसा गिरा**
**अनुग्रहश्च दानं च शीलमेतत्प्रशस्यते ।।**

(शांतीपर्व, अध्याय १२४, श्लोक ६६, महाभारत) **अर्थ :** कृतीने, मनाने आणि वाणीने कोणत्याही प्राण्यास त्रास न देणे, परोपकार करणे, दान करणे या प्रकाराचे शील प्रशस्त होय.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. न्याहरी, नाश्ता
४. हिंमतीची हद्द
७. एकदम योग्य
११. हरिवंशराय बच्चन याची प्रसिद्ध कविता- 'लहरों से डरकर नौका पार नहीं होती, कोशिश करनेवालों की -- नहीं होती!
१२. ग्रामीण बोलीत गौर
१३. पावा
१४. शंभरी गाठणारा
१७. जोरात कोसळणे-ओतणे
१९. मोहिनी, अंमल
२१. खंडाने शेती करणारा
२२. पहारा
२४. काव्यात कोण
२५. वाकलेला
२६. वाल्याचा वाल्मिकी करणारा मंत्र
२७. झूल घेतलेला
२९. अनुतीर्ण
३१. पोहणे, तरंगणे
३२. गुलाबजामुनचा रस
३३. नेटका
३५. मनीमाऊचे वाघोबाशी नाते
३७. भानगड
३८. राजाची आई
३९. संभवमि युगेयुगे'चे आश्वासन देणारा अवतार
४२. च्या पुढे, च्या समक्ष
४४. शेतकऱ्याला दिलेले कर्ज
४५. विक्रमवीर सचिनचे वडील
४७. मासा
४९. माफी
५०. अलिप्त
५२. राबता, जाणे-येणे
५३. एकरूप, एकतान
५६. लोकहित
५७. श्रीयुत, श्रीमान
५९. किंमत
६१. मदनाची सहचरी
६२. यमनगरी
६३. घड्याळाचा आवाज
६५. अमंगल जाळण्याचा सण
६६. रसभंग, विचका
६८. तलवारीचे घर
७०. अंत:करण
७२. रामचरित मानस लिहिणारे
७४. खास अ.नगरकडील
७६. संगोपन- --- पोषण
७७. आश्चर्य
७९. जोरदार
८०. सुबक, कोरून काढलेला
८१. शिवशाहीतील प्रमुख शस्त्र

## उभे शब्द

१. दुश्चिन्ह
२. पापणी (हिंदी)
३. शुष्कता
४. शक्तीमान, पराक्रमी
५. त्वरेने, वेगाने
७. खवलेले खोबरे
८. दूरदेश
९. लुच्चा, खोटा
१०. लहानसहान
१५. शिव्याशाप
१६. लढतना आलेले मरण
१८. जर्दाळूचे बी
२०. पैंजणांचा नाजूक आवाज
२३. बळीला पाताळात गाडणारा
२४. उणीव
२६. धान्याचा ढीग
२८. कपाळ फुटणे
३०. च्या जवळ
३२. दररोजचा, परिपाठातला
३४. निष्णात, वाकबगार
३५. आईचा भाऊ
३६. तहान
३७. द्राक्षाचा वा मोत्यांचा आणि फुलांचाही
३९. अशक्त, बारीक
४०. निरूपयोगी भटकंती
४१. पत्त्यातील पाच-तीन-दोन
४३. श्रीविष्णू
४६. कष्टाळू
४८. मऊ
५१. रायगडवरील एक कडा
५२. प्रत्येक संसारी माणसाची अवस्था याच्याप्रमाणे असते!
५४. तृष्णा
५५. नवऱ्याचा भाऊ
५६. चकचकीत, --- बरक
५८. लज्जित, वरमलेला
५९. मध्यंतरी
६०. गर्दी
६१अ. पण
६५. शिवकालीन नाणे
६७. जहाज
६९. रोकड
७१. प्रहार, वार
७३. वारा
७५. कागदाचे परिमाण
७७. नूतन
७८. संघर्ष, प्रतिकार

## आडवे उत्तर

१.अल्पोपहार ४.मजल ७.चपखल ११.हार १२.गवर १३.बासरी १४.शतकवीरा १७.बदबदा १९.गारूड २१.कूळ २२.रखवाली २४.कवण २५.नत २६.रामराम २७.झूलकरी २९.अनुत्तीर्ण ३१.तरण ३२.पाक ३३.नीटस ३५.मावशी ३७.घोळ ३८.राजमाता ३९.कृष्णावतार ४२.समोर ४४.तगाई ४५.रमेश ४७.मीन ४९.क्षमा ५०.तटस्थ ५२.वावर ५३.रम ५६.जनकल्याण ५७.महाशय ५९.दरदाम ६१.रती ६२.नरक ६३.टिकटिक ६५.होळी ६६.बेरंग ६८.म्यान ७०.मन ७२.तुलसीदास ७४.नगरी ७६.भरण ७७.नवल ७९.दमदार ८०.कातीव ८१.ढाल तलवार

## उभे उत्तर

१.अपशकुन २.पलक ३.रखरख ४.महाबली ५.जरड ७.चव ८.परगाव ९.लबाड १०.बारीकसारीक १५.तळतळाट १६.वीरगती १८.बदाम २०.रूणझुण २३.वामनावतार २४.कमतरता २६.रास २८.कपाळमोक्ष ३०.पाशी ३२.नित्यातला ३४.सराईत ३५.मामा ३६.तृष्ण ३७.घोस ३९.कृश ४०.वणवण ४१.रमी ४३.रमानायक ४६.मेहनत ४८.नरम ५१.टकमक ५२.वाल्या कोळी ५४.तहान ५५.दीर ५६.जरक ५८.शरमिंदा ५९.दरम्यान ६०.दाट ६१अ.परंतु ६५.होन ६७.गलबत ६९.नगद ७०.मणका ७१.घाव ७३.समीर ७५.दम ७७.नव ७८.लढा

## चंदेरी दुनिया

# ९ तास उशिरा आल्याने अमरीश पुरींनी गोविंदाला मारलेली होती कानाखाली?




गोविंदा शूटिंगसाठी नऊ तास उशिरा आल्यामुळे अमरीश पुरींनी त्याला कानाखाली मारल्याचा किस्सा चर्चेत आहे. मात्र, अमरीश पुरींचा मुलगा राजीव पुरीने यामागचं सत्य सांगितलं आहे.

बॉलीवूड अभिनेता गोविंदाच्या सेटवर उश-ीरा जाण्याबद्दलच्या अनेक बातम्या आजही चर्चेत असतात. त्याच्याबरोबर काम केलेले कलाकार व दिग्दर्शकांनी याबद्दही प्रतिक्रियाही दिली आहे. त्याच्यामुळे अनेकदा शूटिंगसाठी उशीर व्हायचा अशा चर्चा अनेकदा ऐकायला मिळतात. एकदा तर उशिरा आल्याने दिवंगत अभिनेते अमरीश पुरी यांनी त्याच्या कानशिलात लगावली होती असंही म्हटलं जातं.अमरीश पुरी यांनी शूटिंगसाठी तब्बल नऊ तास उशिरा पोहोचल्यामुळे अभिनेता गोविंदाला कानाखाली मारल्याचा किस्सा अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. मात्र, आता अमरीश पुरी यांचा मुलगा राजीव पुरीने याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे. त्याच्या वडिलांनी कोणालाही कधी कानशिलात लगावली असेल यावर त्याचा विश्वास नसल्याचं त्याने म्हटलं आहे.

नेमकं काय घडलेलं?

राजीव पुरीने विकी ललवानीला दिलेल्या मुलाख-तीत याबद्दल भाष्य केलं आहे. यावेळी त्याला 'दो कैदी' चित्रपटाशी जोडल्या जाणाऱ्या या प्रसंगाबद्दल विचारण्यात आलं. माध्यमांच्या माहितीनुसार, अमरीश पुरी सकाळी ९ वाजताच्या शूटिंगसाठी सेटवर पोहोचले होते, तर गोविंदा संध्याकाळी ६ वाजता सेटवर आला. गोविंदामुळे झालेल्या विलंबामुळे दोघांमध्ये जोरदार वाद झाला आणि अमरीश पुरी यांनी संपूर्ण क्रूच्या समोर गोविंदाला कानाखाली मारली, असं म्हटलं जातं. मात्र राजीवने त्याच्या वडिलांचा स्वभाव पाहता त्यांनी असं काही केलं असेल असं वाटत नाही असं म्हटलं आहे.

अमरीश पुरींच्या मुलाची प्रतिक्रिया

अमरीश पुरी यांचा मुलगा म्हणाला, ङ्गमला वाटत नाही की हे खरं आहे. त्यांचा रागावरचा ताबा कधीच सुटायचा नाही. ते अशा पद्धतीने कधीही रागावायचे नाहीत. एखाद्या व्यक्तीने त्यांना दोन-तीन वेळा त्रास दिल्यानंतरच ते आवाज चढवायचे. पण त्यानंतरही त्यांनी कोणाला कानाखाली मारली असेल, असं मला वाटत नाही. हे खरं नाही. मीही याबद्दल ऐकलं आणि

### मुलगा राजीव पुरीने सांगितलं सत्य



वाचलं आहे. पण माझ्यासाठी या गोष्टीला फारसं महत्त्व नाही, कारण मला माहीत आहे की, बाबा असं कधीच काही करणार नाहीत.ङ्ग

गोविंदाने अमरीश पुरींसह पुन्हा काम का केलं नाही?

मात्र, गोविंदाच्या उशिरा येण्याच्या सवयीचा अमरीश पुरींबरोबरच्या त्याच्या भविष्यातील कामावर परिणाम झाला असावा, असा अंदाज राजीव पुरीने व्यक्त केला. त्याच्या वडिलांना अशा प्रकारे उशिरा येणं पसंत नसावं, याची जाणीव कदाचित गोविंदाला झाली असावी, असं त्याने सांगितलं आहे. राजीव पुरी म्हणाला, ङ्गकदाचित याच कारणामुळे गोविंदाने भविष्यात वडिलांबरोबर काम केलं नसेल. उशिरा येण्याच्या सवयीमुळे त्यांच्याबरोबर जमणार नाही हे कदाचित त्याच्या लक्षात आलं असेल आणि म्हणूनच त्याने पुन्हा त्यांच्यासह काम केलं नसेल. पण अशा गोष्टीं-चा बाबांनी कधी मनात राग धरला असेल, असं मला वाटत नाही. अमरीश पुरी आणि गोविंदाने १९८९ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दो कैदी' या चित्रपटात एकत्र काम केलं होतं. हा चित्रपट दोघांचा शेवटचा एकत्रित काम केलेला चित्रपट असल्याचं सांगितलं जातं. मात्र, त्यानंतर दोघांनी पुन्हा एकत्र काम का केलं नाही, याबाबत गेल्या अनेक वर्षांत वेगवेगळ्या चर्चा रंगल्याचं पाहायला मिळालं आहे.


## श्वेता तिवारी प्रकरणात मोठा ट्विस्ट; ट्रोलर मनसेचा सदस्य नसल्याचं उघड



मुंबई : अभिनेत्री श्वेता तिवारीने ऑनलाइन महिलांविरोधात आक्षेपार्ह आणि अपमानजनक टिप्पणी करणाऱ्या काही सोशल मीडिया वापरकर्त्यांबाबत मनसे प्रमुख राज ठाकरे यांना प्रश्न विचारल्यानंतर घडलेल्या घटनांबाबत स्पष्टीकरण दिले आहे. संबंधित व्यक्ती मनसेचे सदस्य नसल्याचे पक्षाशी संबंधित एका वकिलाने आपल्याला स्पष्ट केल्याचे श्वेताने सांगितले. काही दिवसांपूर्वी श्वेताने महिलांविरोधात आक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या काही सोशल मीडिया अकाउंट्सचे स्क्रीनशॉट शेअर केले होते. यातील काही जण मनसे समर्थक असल्याचा दावा करत असल्याचे सांगत, अशा वर्तनाला पक्षाचा पाठिंबा आहे का, असा सवाल तिने राज ठाकरे यांच्याकडे केला होता. यानंतर मनसे समितीशी संबंधित एका वकिलाने श्वेताशी संपर्क साधला. संबंधित व्यक्ती पक्षाची सदस्य नसल्याचे तसेच महिलांविरोधातील अशा प्रकारच्या वर्तनाला पक्ष समर्थन देत नसल्याचे त्यांच्याकडून स्पष्ट करण्यात आल्याचे श्वेता तिवारीने सांगितले. श्वेताच्या म्हणण्यानुसार, या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी काही दिवसांची मुदत मागण्यात आली होती. मात्र, अवघ्या तीन दिवसांत संबंधित व्यक्तीचा फोन नंबर आणि त्याने स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेले माफीपत्र त्यांना पाठवण्यात आले. श्वेताने या माफीपत्राचा स्क्रीनशॉटही इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला. या प्रकरणाचा पाठपुरावा केल्याबद्दल श्वेताने मनसे टीमचे आभार मानले. महिलांचा अपमान करणाऱ्या वर्तनाला गांभीर्याने घेतल्याचेही श्वेताने नमूद केले.

ऑनलाइन छळाची समस्या एका व्यक्तीपुरती मर्यादित नाही. दरम्यान, या घटनेनंतर श्वेताने ऑनलाइन ट्रोलिंग आणि महिलांच्या छळाच्या व्यापक समस्येवरही चिंता व्यक्त केली. सोशल मीडिया आणि स्क्रीनमागे लपून कोणत्याही परिणामांची भीती न बाळगता महिलांवर आक्षेपार्ह टिप्पणी करणाऱ्यांची संख्या मोठी असल्याचे तिने म्हटले. ही समस्या केवळ एका व्यक्ती किंवा एका घटनेपुरती मर्यादित नसून, ममहिलांचा ऑनलाइन छळ करण्याला कोणताही परिणाम भोगावा ला-गणार नाहीफ, अशी मानसिकता बदलण्याची गरज असल्याचे श्वेताने सांगितले. तंत्रज्ञान कंपन्या आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सनी ऑनलाइन छळ, विशेषतः महिलांविरोधातील गैरवर्तन रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही श्वेता तिवारीने अधोरेखित केले.

# अक्किनेनी नागार्जुनः एक महान अभिनेता आणि चित्रपटसृष्टीचा महानायक



## वाढदिवस विशेष

## २९ ऑगस्ट १९५९

**अक्किनेनी नागार्जुन हे भारतीय चित्रपटसृष्टीतील, विशेषतः तेलगू सिनेमातील एक अत्यंत प्रतिष्ठित आणि प्रभावशाली नाव आहे. त्यांनी आपल्या अष्टपैलू अभिनयाने, देखण्या व्यक्तिमत्त्वाने आणि चित्रपट निर्मितीच्या कौशल्याने कोट्यवधी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे. चित्रपटसृष्टीत त्यांना प्रेमाने 'किंग नागार्जुन' किंवा 'युवसम्राट' म्हणून ओळखले जाते. केवळ एक अभिनेता म्हणूनच नव्हे, तर एक यशस्वी निर्माता, व्यावसायिक आणि दूरदर्शन सूत्रसंचालक म्हणूनही त्यांनी आपली एक वेगळी आणि अमिट ओळख निर्माण केली आहे. या विस्तृत चरित्रामध्ये आपण त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या चित्रपट प्रवासाचा आणि त्यांच्या अफाट योगदानाचा सखोल आढावा घेणार आहोत.**

**१: जन्म, कुटुंब आणि शिक्षण**

नागार्जुन यांचा जन्म २९ ऑगस्ट १९५९ रोजी तामिळनाडूतील चेन्नई (तेव्हाचे मद्रास) येथे झाला. त्यांचे कुटुंब मूळचे आंध्र प्रदेशातील असून, त्यांचे वडील अक्किनेनी नागेश्वर राव हे तेलगू चित्रपटसृष्टीतील अत्यंत दिग्गज आणि मानकरी अभिनेते होते. त्यांच्या मातोश्री अन्नपूर्णा अक्किनेनी यांच्या नावावरूनच त्यांच्या प्रसिद्ध 'अन्नपूर्णा स्टुडिओ'चे नाव ठेवण्यात आले आहे.

नागार्जुन यांचे बालपण एका कलात्मक आणि चित्रपटसृष्टीशी जोडलेल्या वातावरणात गेले. मात्र, त्यांच्या वडिलांची अशी इच्छा होती की नागार्जुन यांनी आपले शिक्षण पूर्ण करावे. त्यांनी आपले शालेय शिक्षण हैदराबाद येथील हैदराबाद पब्लिक स्कूलमधून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी लिटिल फ्लॉवर ज्युनिअर कॉलेजमधून आपले पुढील शिक्षण घेतले. नागार्जुन यांना विज्ञानाची आणि अभियांत्रिकीची आवड होती, त्यामुळे त्यांनी गिंडी, चेन्नई येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेचा प्रवास केला, जिथे त्यांनी मिशिगनमधील इस्टर्न मिशिगन युनिव्हर्सिटीमधून ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगमध्ये मास्टर डिग्री पूर्ण केली.

**२: चित्रपटसृष्टीत पदार्पण आणि सुरुवातीचा काळ**

उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर नागार्जुन भारतात परतले आणि त्यांनी आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत अभिनय क्षेत्रात येण्याचा निर्णय घेतला. १९८६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'विक्रम' या चित्रपटातून त्यांनी मुख्य अभिनेता म्हणून पदार्पण केले. हा चित्रपट हिंदी ब्लॉकबस्टर 'हिरो'चा रिमेक होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरला आणि नागार्जुन यांच्या रूपाने तेलगू सिनेमाला एक नवा स्टार मिळाला. त्यानंतरच्या काळात त्यांनी 'मजनू', 'संकीर्तन' आणि 'आखरी पोरटम' यांसारख्या चित्रपटांमध्ये काम केले. 'आखरी पोरटम' चित्रपटात त्यांनी श्रीदेवी यांच्यासोबत काम केले, जो एक मोठा व्यावसायिक विजय ठरला आणि यामुळे नागार्जुन यांची स्टार व्हॅल्यू आणखी वाढली.

**३: 'शिवा' आणि भारतीय चित्रपटसृष्टीतील क्रांती**

१९८९ हे वर्ष नागार्जुन यांच्या कारकिर्दीतील आणि संपूर्ण भारतीय चित्रपटसृष्टीतील एक मैलाचा दगड ठरले. या वर्षी दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला 'शिवा' हा चित्रपट प्रदर्शित झाला. हा एक कॉलेज राजकारण आणि गुंडगिरीवर आधारित ॲक्शन चित्रपट होता.

'शिवा' चित्रपटाने तेलगू चित्रपटसृष्टीची व्याख्याच बदलून टाकली. या चित्रपटातील नागार्जुन यांचा अभिनय, त्यांची स्टाईल आणि सायकलची चेन हातात घेण्याचा तो आयकॉनिक सीन कमालीचा गाजला. या चित्रपटाने केवळ दक्षिण भारतातच नव्हे, तर संपूर्ण देशात धुमाकूळ घातला. या चित्रपटाचा हिंदी रिमेक देखील करण्यात आला, ज्याद्वारे नागार्जुन यांनी बॉलिवूडमध्ये धमाकेदार पदार्पण केले. 'शिवा' चित्रपटाने त्यांना एका रात्रीत ॲक्शन स्टार म्हणून स्थापित केले.

**४: रोमान्स आणि कौटुंबिक चित्रपटांचे राजे**

'शिवा'नंतर नागार्जुन यांनी केवळ ॲक्शन चित्रपटांपुरते मर्यादित न राहता आपल्यातील रोमँटिक अभिनेत्याला समोर आणले. मणिरत्नम यांच्या 'गीतांजली' या चित्रपटाने प्रेक्षकांना वेड लावले. हा एक भावूक आणि निखळ प्रेमकथा असलेला चित्रपट होता, ज्याला राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाला.

त्यानंतर 'निन्ने पेल्लादता' या कौटुंबिक आणि रोमँटिक चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर नवे विक्रम प्रस्थापित केले. या चित्रपटात त्यांची आणि तबू यांची केमिस्ट्री खूप पसंत केली गेली. नागार्जुन हे महिला प्रेक्षकांमध्ये अत्यंत लोकप्रिय झाले, आणि त्यांना रोमान्सचा राजा म्हटले जाऊ लागले.

**५: भक्तीपट आणि ऐतिहासिक भूमिका**

नागार्जुन यांच्या कारकिर्दीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी व्यावसायिक चित्रपटांसोबतच अत्यंत कठीण अशा भक्तीप्रधान भूमिका लीलया पेलल्या. १९९७ मध्ये आलेल्या 'अन्नमय्या' या चित्रपटात त्यांनी १५ व्या शतकातील संत कवी अन्नमाचार्य यांची भूमिका साकारली. या भूमिकेसाठी त्यांनी घेतलेले कष्ट आणि त्यांचा जिवंत अभिनय पाहून प्रेक्षक भारावून गेले. या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराचा सन्मान मिळाला.

त्यानंतर त्यांनी 'श्री रामदासू', 'शिरडी साई' आणि ' नमो व्यंकटेशाय' यांसारख्या भक्तीपटांमध्ये उत्कृष्ट भूमिका साकारून आपण कोणत्याही प्रकारची भूमिका करू शकतो हे सिद्ध केले.

**६: बॉलिवूडमधील प्रवास**

नागार्जुन यांनी केवळ तेलगू चित्रपटसृष्टी गाजवली नाही, तर बॉलिवूडमध्येही आपली छाप सोडली. 'शिवा'च्या यशानंतर त्यांनी 'खुदा गवाह' चित्रपटात अमिताभ बच्चन यांच्यासोबत महत्त्वाची भूमिका साकारली. याशिवाय 'गुन्हेगार', 'मिस्टर बेचारा', 'अंगारे' आणि 'झखम' या चित्रपटांमधील त्यांच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले. अलिकडच्या काळात त्यांनी 'ब्रह्मास्त्र' या भव्य चित्रपटात 'नंदी अस्त्र' ची भूमिका साकारून हिंदी प्रेक्षकांना पुन्हा एकदा मंत्रमुग्ध केले.

**७: निर्माता, व्यावसायिक आणि दूरदर्शन**

नागार्जुन हे केवळ एक उत्तम अभिनेते नाहीत, तर एक अत्यंत यशस्वी व्यावसायिक देखील आहेत. ते 'अन्नपूर्णा स्टुडिओ'चे प्रमुख आहेत, जो दक्षिण भारतातील सर्वात आधुनिक स्टुडिओपैकी एक आहे. या स्टुडिओच्या बॅनरखाली त्यांनी अनेक दर्जेदार चित्रपटांची निर्मिती केली आहे.

दूरदर्शनच्या दुनियेतही त्यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. त्यांनी तेलगू भाषेतील अत्यंत लोकप्रिय शो 'मीलो एवरू कोटीश्वरूळू' (कोण बनेल करोडपतीचे तेलगू रूप) आणि 'बिग बॉस तेलगू' चे यशस्वी सूत्रसंचालन केले आहे. त्यांच्या खास शैलीमुळे हा शो प्रचंड लोकप्रिय ठरला.

**८: वैयक्तिक जीवन आणि वारसा**

नागार्जुन यांचे वैयक्तिक जीवनही नेहमीच चर्चेत राहिले आहे. त्यांचा पहिला विवाह लक्ष्मी दग्गुबती यांच्याशी झाला होता (ज्या प्रसिद्ध निर्माते डी. रामानायडू यांच्या कन्या आहेत). त्यांना नागा चैतन्य हा मुलगा आहे, जो आज तेलगू चित्रपटसृष्टीतील एक आघाडीचा अभिनेता आहे. नंतर काही कारणास्तव त्यांचा घटस्फोट झाला. त्यानंतर नागार्जुन यांनी त्यांची सहकलाकार अमला यांच्याशी लग्न केले. अमला या देखील एक प्रसिद्ध अभिनेत्री आणि प्राणिमित्र आहेत. त्यांना अखिल अक्किनेनी हा मुलगा आहे, तोही चित्रपटसृष्टीत सक्रिय आहे.नागार्जुन यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत ९० पेक्षा जास्त चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्यांना अनेक नंदी पुरस्कार, फिल्मफेअर पुरस्कार आणि राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. वयाच्या ६० व्या वर्षीही त्यांचे फिटनेस आणि ग्लॅमर पाहून तरुण पिढी थक्क होते, म्हणूनच त्यांना टॉलीवूडचे सदाबहार राजे म्हटले जाते.

**निष्कर्ष:**अक्किनेनी नागार्जुन हे भारतीय चित्रपटसृष्टीचा एक सुवर्ण इतिहास आहेत. त्यांनी प्रत्येक दशकात स्वतःला बदलत्या काळासोबत अपडेट ठेवले आहे. नवीन दिग्दर्शकांना संधी देणे आणि चित्रपटसृष्टीत नवनवीन प्रयोग करणे हा त्यांचा स्वभाव आहे. त्यांचा हा समृद्ध प्रवास येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

**९: दशकानुसार कारकिर्दीचा सखोल अभ्यास**

**१९८० चे दशक: पदार्पण आणि पायाभरणी**

या दशकात नागार्जुन यांनी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले. त्यांचे सुरुवातीचे चित्रपट जसे की 'विक्रम' आणि 'कॅप्टन नागार्जुन' यांनी त्यांच्यातील व्यावसायिक अभिनेत्याची चुणूक दाखवली. या दशकातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'शिवा' आणि 'गीतांजली'. एकाच वर्षात दोन पूर्णपणे भिन्न शैलीतील चित्रपट देऊन त्यांनी सिद्ध केले की ते कोणत्याही चौकटीत अडकणारे अभिनेते नाहीत.

**१९९० चे दशक: यशाचे शिखर आणि अष्टपैलूत्व**

९० चे दशक हे नागार्जुन यांच्या कारकिर्दीतील सुवर्णकाळ मानला जातो. या काळात त्यांनी 'अल्लरी अल्लुडू', 'घराणा बुलोडू', 'हॅलो ब्रदर' यांसारखे अफाट व्यावसायिक यशस्वी चित्रपट दिले. याच काळात त्यांनी 'अन्नमय्या' सारखा ऐतिहासिक भक्तीपट करून समीक्षकांना चकित केले. या दशकात त्यांनी बॉलिवूडमध्येही 'खुदा गवाह' आणि 'झखम' सारख्या चित्रपटांमधून राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवली.

२००० चे दशक: नवीन प्रयोग आणि परिपक्वता

या दशकात नागार्जुन यांनी अधिक प्रगल्भ भूमिकांकडे आपला मोर्चा वळवला. 'आझाद', 'संतोषम', 'मन्मथुडू' आणि 'मास' हे या दशकातील त्यांचे प्रमुख चित्रपट होते. 'मन्मथुडू' हा चित्रपट आजपर्यंतचा सर्वात क्लासिक रोमँटिक-कॉमेडी चित्रपट मानला जातो. तर 'मास' या चित्रपटातून त्यांनी मोठ्या प्रेक्षकवर्गावर आपली पकड मजबूत केली.

२०१० चे दशक: कौटुंबिक वारसा आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व

या दशकात नागार्जुन यांनी आपले वडील एएनआर आणि मुले नागा चैतन्य आणि अखिल यांच्यासोबत 'मनम' या अत्यंत भावनिक आणि संस्मरणीय चित्रपटात काम केले. हा चित्रपट अक्किनेनी कुटुंबाचा एक प्रकारे कौटुंबिक उत्सव होता. याशिवाय 'ऊपिरी' चित्रपटात त्यांनी साकारलेली एका दिव्यांग व्यक्तीची भूमिका त्यांच्या अभिनयातील सर्वोच्च टप्प्यांपैकी एक मानली जाते.

**२०२० चे दशक: आधुनिक काळ आणि डिजिटल पदार्पण**

वयाच्या साठवीनंतरही नागार्जुन अत्यंत सक्रिय आहेत. त्यांनी 'वाइल्ड डॉग', 'द घोस्ट' आणि 'ना सामी रंगा' यांसारख्या आधुनिक ॲक्शन चित्रपटांमध्ये काम केले. तसेच 'ब्रह्मास्त्र' सारख्या मोठ्या पॅन-इंडिया चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारून आपली उपस्थिती दर्शवली.

**१०: प्रमुख चित्रपटांचे सखोल विश्लेषण**

विक्रम (१९८६): पदार्पणाचा चित्रपट, ज्याने त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीची यशस्वी सुरुवात करून दिली. विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.

शिवा (१९८९): भारतीय सिनेमाचा चेहरा बदलणारा चित्रपट. कॉलेज राजकारण आणि वास्तववादी ॲक्शनचा उत्कृष्ट नमुना.विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.गीतांजली (१९८९): मणिरत्नम यांचे दिग्दर्शन आणि नागार्जुन यांचा भावनिक अभिनय, प्रेमकथेचा एक उत्कृष्ट नमुना.विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.

**खुदा गवाह (१९९२): अमिताभ बच्चन** यांच्यासोबतची महत्त्वाची भूमिका, ज्याने हिंदी पट्ट्यात नागार्जुन यांना प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली.विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.हॅलो ब्रदर (१९९४): द्विभूमिका असलेला चित्रपट, ज्याने नागार्जुन यांच्यातील उत्तम विनोदी शैली समोर आणली.

विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.

निन्ने पेल्लादता (१९९६): कौटुंबिक मूल्यांवर आधारित एक संगीतमय तुफान यशस्वी चित्रपट.

विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.

अन्नमय्या (१९९७): अन्नमाचार्य यांच्या भूमिकेत नागार्जुन यांनी अभिनयाची पराकाष्ठा केली. चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाले.

विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.

झखम (१९९८): महेश भट्ट यांच्या दिग्दर्शनातील चित्रपट, ज्यातील नागार्जुन यांच्या अभिनयाचे समीक्षकांनी खूप कौतुक केले.

विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.

आझाद (२०००): देशभक्ती आणि सामाजिक विषयावर आधारित एक यशस्वी व्यावसायिक चित्रपट.

विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.

मन्मथुडू (२००२): मुलींचा तिरस्कार करणाऱ्या एका व्यक्तीची मजेशीर आणि रोमँटिक कथा, सदाबहार गाणी आणि संवाद.विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.मास (२००४): राघव लॉरेन्स दिग्दर्शित जबरदस्त ॲक्शनपट, जो मोठ्या प्रेक्षकवर्गात तुफान गाजला.

विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.

श्री रामदासू (२००६): आणखी एक उत्कृष्ट भक्तीपट, ज्यामध्ये त्यांनी कांचेरला गोपण्णा यांची भूमिका साकारली.विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.मनम (२०१४): अक्किनेनी पिढ्या एकत्र आणणारा चित्रपट, जो तेलगू सिनेमाच्या इतिहासात अमर झाला.

विश्लेषण: या चित्रपटात नागार्जुन यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. प्रेक्षकांनी त्यांच्या रूपरेषेची आणि संवादांची खूप प्रशंसा केली. हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीला एका नवीन उंचीवर घेऊन गेला. यामधील संगीत आणि दिग्दर्शन अत्यंत उच्च दर्जाचे होते.

ऊपिरी (२०१६): व्हीलचेअरवर बसलेल्या करोडपतीची भूमिका, जी नागार्जुन यांच्या अभिनय क्षमतेची साक्ष देते.

# औंढा नागनाथ मंदिरावरील शिल्पकला नैसर्गिक रंगसंगतीत साकारावी –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## औंढा नागनाथसह नागपूरच्या कल्याणेश्वर मंदिर विकास आराखड्याला शिखर समितीची मंजूरी; आंबेगाव येथील शिवसृष्टीसाठी ५० कोटी मंजूर

**मुंबई/प्रतिनिधी :** औंढा नागनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. या मंदिरावरील पुरातन शिल्पकलेचे जतन करत नैसर्गिक रंगांचा वापर करुन त्याचे संवर्धन करण्यात यावे. तलाव आणि मंदिर परिसरात वापरले जाणारे दगड आणि इतर साहित्य त्याचप्रमाणे एकूणच सर्व कामे दर्जेदार असावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत श्री क्षेत्र औंढा नागनाथ तसेच नागपूर येथील कल्याणेश्वर मंदिराच्या सुधारित तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला मान्यता देण्यात आली. तसेच पुण्याजवळ आंबेगाव येथील शिवसृष्टी थीम पार्कच्या चौथ्या टप्प्याच्या कामासाठी ५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार संतोष बांगर, प्रवीण दटके, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत औंढा नागनाथ मंदिराच्या १९३ कोटी ५५ लाख २० हजार ४७४ तर, कल्याणेश्वर मंदिराच्या ७२.४९ कोटींच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली. आंबेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित शिवसृष्टी ऐतिहासिक थीम पार्क प्रकल्पाच्या प्रगतीचा यावेळी आढावा घेण्यात आला. यातील चौथ्या टप्प्यासाठीच्या कामासाठी ५० कोटींच्या निधीलाही मंजूरी देण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी औंढा नागनाथ मंदिर परिसराचा विकास करताना मंदिराचे वैभव जपण्याचे निर्देश दिले. तर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी जतन आणि संवर्धनाबरोबरच भाविकांसाठी चांगल्या सोयी-सुविधा निर्माण करण्याची सूचना केली.

**औंढा नागनाथ मंदिर परिसराचा विकास आराखडा**

औंढा नागनाथ मंदिराच्या संवर्धन आणि जीर्णोद्धाराचे काम पुरातत्व आणि सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाणार असून यामध्ये मंदिराच्या आवारातील नंदी मंडप, ओवरी आणि दर्शन बारी या मंदिराच्या आवारातील वास्तूंचे संवर्धन केले जाणार आहे. यासह हरीहर तलाव आणि परिसरातील मंदिरांचे संवर्धन आणि जीर्णोद्धार केला जाणार आहे. मंदिर परिसरासाठी बाह्य विद्युतीकरण, सीसीटीव्ही, रोषणाई आणि




उद्यान विकास देखील केला जाणार आहे. भक्त निवासाची नव्याने उभारणी केली जाणार असून २५०० क्षमतेचा प्रतीक्षा कक्ष असणार आहे. भाविकांना कमी वेळेत दर्शन मिळावे, यादृष्टीने याचे नियोजन केले जाणार असून दर्शन रांगेत भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील. याचबरोबर मंदिराचे वैभव कायम राखून मोठी झाडे लावणे, परिसराला दगडी बांधकामासारखा साज देणे, परिसरात सापडलेल्या जुन्या मूर्त्या भाविकांना पाहता याव्यात यासाठी म्युझियम तयार करणे, भाविकांना माहिती देण्यासाठी माहिती केंद्र उभारणे आदी कामे केली जाणार असल्याची माहिती हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

कल्याणेश्वर मंदिर परिसरात पार्किंगची व्यवस्था वाढवावी

नागपूर येथील ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व असलेल्या कल्याणेश्वर मंदिर महाल परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्याचा आढावा घेताना आवश्यकता विचारात घेऊन पार्किंगची व्यवस्था वाढविण्यात यावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. तथापि, अशा परिसरात यांत्रिक पार्किंगचा वापर व्यवहार्य ठरत नसल्याने साध्या पार्किंगची व्यवस्था असावी, असे ते म्हणाले.

नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यावेळी यापूर्वी शिखर समितीच्या बैठकीत देण्यात आलेल्या सूचनांनुसार मंदिर विकास आराखड्यात करण्यात आलेल्या बदलांची माहिती दिली. त्यानुसार बेसमेंटमधील यांत्रिक वाहनतळ वगळून त्याठिकाणी दोन तळघरांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच निवासी व्यवस्था वगळण्यात आली असून मंदिराच्या शिखराचे बांधकाम प्रस्तावात समाविष्ट करण्यात आले आहे. या सुधारणांनंतर प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च ७२.४९ कोटी रुपये इतका निश्चित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. या खर्चास शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

कल्याणेश्वर मंदिर हे नागपूरमधील ऐतिहासिक आणि धार्मिक श्रद्धास्थान असून प्रस्तावित विकास आराखड्यात मंदिर परिसराचे हेमाडपंथी स्थापत्यशैलीनुसार सुशोभीकरण, भव्य सभामंडप, बहुउद्देशीयसभागृह, महाप्रसादासाठी स्वतंत्र सुविधा, प्रशासकीय कार्यालये, वेदशाळा, योगशाळा, प्रसाधनगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, भाविकांसाठी विविध सुविधा तसेच दोन स्तरांवरील तळघरांचा समावेश करण्यात आला आहे.

या बैठकीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्य, पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेचा प्रेरणादायी इतिहास आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुणे येथील आंबेगाव बुद्रुक परिसरात विकसित करण्यात येत असलेल्या 'शिवसृष्टी' ऐतिहासिक थीम पार्क प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला. यावेळी शिवसृष्टी प्रकल्पाचे अध्यक्ष जगदीश कदम यांनी विविध टप्प्यांतील कामांची सविस्तर माहिती सादर केली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित हा प्रकल्प देशातील तसेच आशियातील वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक थीम पार्क म्हणून विकसित करण्यात येत असून, नव्या पिढीपर्यंत शिवचरित्र प्रेरणादायी आणि प्रभावी पद्धतीने पोहोचविण्याचा त्यामागील उद्देश असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## पोलीस बांधवांना राखी बांधून अभाविपकडून कृतज्ञता व्यक्त

**औराद शहाजानी/प्रतिनिधी :** रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, औराद शाखेच्या वतीने समाजाचे खरे आधारस्तंभ असलेल्या कर्तव्यदक्ष पोलीस बांधव तसेच विविध क्षेत्रांत निःस्वार्थपणे सेवा देणाऱ्या बांधवांना राखी बांधून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

समाजात शांतता, सुरक्षितता आणि सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलीस बांधव अहोरात्र कार्यरत असतात. सण-उत्सवाच्या काळातही कर्तव्य बजावत समाजाच्या सुरक्षेसाठी योगदान देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रांत समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींनाही राखी बांधून त्यांच्या सेवेला सलाम करण्यात आला.

या उपक्रमातून रक्षाबंधनाचा सण केवळ भाऊ-बहिणीच्या नात्यापुरता मर्यादित न राहता समाजातील परस्पर स्नेह, बंधुभाव आणि कृतज्ञतेची भावना वृद्धिंगत करणारा ठरला.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे औराद मंडल प्रमुख राजकुमार सूर्यवंशी, अभाविपचे जिल्हा संयोजक भागवत बिरादार, शहर सहमंत्री रोहिणी कांबळे, कार्यालय मंत्री गायत्री पुरी, कलामंच संयोजक वैष्णवी भंडारे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.




## जय वैभवीलक्ष्मी फाउंडेशनचा सहकार भुषण पुरस्कार दिलीपराव देशमुख यांना जाहीर

### पुण्यात ३१ ऑगस्ट रोजी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत होणार गौरव

**लातूर/प्रतिनिधी :** पुणे येथील जय वैभवीलक्ष्मी फाउंडेशन यांच्यावतीने २०२६ चा देण्यात येणारा सहकार भुषण पुरस्कार राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांना जाहीर करण्यात आला असून पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता केंद्रीय सहकार व विमान उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते देण्यात येणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जय वैभवीलक्ष्मी फाउंडेशन अध्यक्ष उल्हासदादा पवार राहणार आहेत तर प्रमुख उपस्थिती म्हणून राज्याचे माजी



मंत्री काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील राष्ट्रीय साखर महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील , माजी मंत्री आमदार सतेज पाटील,आमदार भीमराव तापकीर खासदार डॉक्टर शिवाजीराव काळगे आमदार डॉ अतुल बाबा भोसले लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धीरज विलासराव देशमुख, जेष्ठ अभिनेत्री आशाताई काळे, अँड सौरभ अंकलकोटे पाटील वैभव लक्ष्मी ग्रुपचे संस्थापक प्रा. डॉ व्हि एस अंकलकोटे पाटील यांची उपस्थिती राहणार आहे.

या सहकार भुषण कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन वैभव लक्ष्मी ग्रुपचे उपाध्यक्ष शशिकांत पागे, विश्वस्त डॉ स्वरूप एकलुरे , अँड मिथुन गुरव यांनी केले आहे.


## रक्षाबंधना सोबतच आज काळाची गरज वृक्षबंधनाची! आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन

**लातूर/प्रतिनिधी :** रक्षाबंधनाचा सण, रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि संरक्षणाच्या वचनाचा सण नाही, तर आपल्या आयुष्यातील प्रत्येक नात्याची जपणूक करण्याची आठवण करून देणारा दिवस आहे. याच भावनेला निसर्गाशी जोडत 'आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन'ने रक्षाबंधना सोबतच वृक्षबंधनाचा अनोखा उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश दिला.

गेल्या २६४६ दिवसांपासून लातूर शहर आणि परिसराला स्वच्छ लातूर, सुंदर लातूर आणि हरित लातूर करण्याच्या ध्येयाने अविरत कार्य करणाऱ्या आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनची प्रत्येक सण झाडांसोबत साजरा करण्याची परंपरा आहे.

याच परंपरेनुसार आज जिल्हा परिषद कार्यालय, लातूर समोरील मुख्य रस्त्यावर रक्षाबंधनाच्या निमित्ताने झाडांना राखी बांधून 'वृक्षबंधन' साजरे करण्यात आले.

झाड म्हणजे केवळ हिरवाई नाही, ते आपल्या पुढच्या पिढीच्या श्वासाची हमी




आहे! यावर्षी आजवर झालेला अत्यल्प पाऊस आणि भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या दुष्काळी परिस्थितीची जाणीव लातूरकरांना करून देण्यासाठी या उपक्रमातून विशेष जनजागृती करण्यात आली. पाण्याचे महत्त्व, झाडांचे संवर्धन आणि पर्यावरणाची जबाबदारी याबाबत नागरिकांना जागरूक करण्यात आले.

**आजची राखी केवळ मनगटावर नव्हे झाडांच्या खोडावरही बांधली गेली!**

भाऊ-बहिणीच्या नात्याचे संरक्षण करण्याची शपथ आपण दरवर्षी घेतो. मात्र, आपल्याला प्राणवायू देणाऱ्या झाडांचे संरक्षण करण्याची शपथ आपण कधी घेणार?


एका झाडाला बांधलेली राखी म्हणजे निसर्गाला दिलेले एक वचन आहे तू आम्हाला सावली दे आम्ही तुला जगवू!

एका झाडाला बांधलेली राखी म्हणजे भविष्यातील पिढीला दिलेली हमी आहे तुमच्या वाट्याला हिरवळ, शुद्ध हवा आणि पाणी देण्यासाठी आम्ही आजपासून प्रयत्न करू.

यावेळी ग्रीन लातूर वृक्ष सदास्यांनी लातूरकरांना आवाहन करताना सांगितले की, पाण्याची बचत करा. रक्षाबंधनाच्या निमित्ताने आपल्या बहिणीला एखादं सुंदर झाड भेट द्या आणि स्वतःही एक झाड लावा. बहिणीने हातावर बांधलेली राखी तिच्या संरक्षणाचे वचन देते, पण झाडाशी बांधलेली राखी आपल्या संपूर्ण समाजाच्या भविष्यातील संरक्षणाचे वचन ठरेल.

त्यांनी पुढे प्रत्येक कुटुंबाने सण-समारंभाच्या निमित्ताने एक तरी झाड लावावे आणि लावलेल्या झाडाची केवळ लागवड न करता त्याची मुलाप्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन केले.

यावेळी डॉ. भास्कर बोरगावकर यांनी श्री. बालासाहेब बावणे यांनी तयार केलेल्या सुंदर आणि पर्यावरणपूरक राखीचे कौतुक केले. तसेच वृक्षबंधनाच्या या उपक्रमासाठी उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानले.




## मुक्तांगण इंग्लिश स्कुलमध्ये राखी पौर्णिमा उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** विशाल नगर, लातूर येथील मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये राखी पौर्णिमेचा सणउत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शाळेच्या प्रभारी प्राचार्या माधुरी वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.


राखी पौर्णिमा हा भाऊ-बहिणीच्या प्रेम, आपुलकी आणि रक्षणाच्या नात्याचे प्रतीक असलेला सण आहे. या सणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगताना शिक्षिका निशिगंधा सोट पाटील यांनी राखी पौर्णिमेची परंपरा व सांस्कृतिक महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी शाळेतील विद्यार्थिनींनी आपल्या वर्गातील बंधूंना राखी बांधून हा सण आनंदात साजरा केला. विद्यार्थ्यांमध्ये यामुळे प्रेम, बंधुभाव आणि परस्पर स्नेहाची भावना वृद्धिंगत झाली.

या प्रसंगी शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना राखी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.




प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# कुंभमेळ्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे
# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे दर १२ वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे उदघाटन सायंकाळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी या प्रदर्शनाची पाहणी केली.

रोटरी क्लब ऑफ नाशिक नाईन हिल्स आणि नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुदक्षिणा हॉलमधील डॉ. सुनंदा म.गोसावी आर्ट गॅलरीत आजपासून छायाचित्र प्रदर्शन सुरू झाले. ते ३० ऑगस्ट, २०२६ पर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार आहे.

उद्घाटन सोहळ्यास राज्याचे जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, महापौर हिमगौरी आडके, आमदार सरोज अहिरे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महंत भक्ती चरणदास महाराज यांच्यासह रोटरी क्लब ऑफ नाशिक नाईन हिल्सचे अध्यक्ष अभय नेरकर, सचिव हर्षद बेळे, कार्यकारी सचिव अभिषेक व्यास, नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष सतीश काळे, सचिव प्रशांत खरोटे, सतीश देवगिरे, अशोक गवळी, नीलेश तांबे, अंबादास शिंदे, हेमंत घोरपडे, विवेक बोकील, भूषण पाटील आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक उपस्थित होते.

या प्रदर्शनात सिंहस्थ कुंभमेळ्यांतील दुर्मिळ, अप्रकाशित छायाचित्रे मांडण्यात आली आहेत. सन १९३२ पासूनच्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ऐतिहासिक आठवणींचा अमूल्य ठेवा या छायाचित्रांमधून उलगड्यात आला आहे. बदलते नाशिक, साधू-संतांचे आखाडे, शाही स्नानाची परंपरा, भाविकांचा महासागर, धार्मिक विधी, तत्कालीन सामाजिक जीवन, कुंभमेळ्याचे बदलते स्वरूप या छायाचित्रांतून पाहावयास मिळणार आहे.



## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुलमध्ये रक्षा बंधन सण उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये रक्षा बंधनाचा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख व्हावी आणि भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे व स्नेहाचे नाते दृढ व्हावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने व संगिता शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थिनी श्रावणी शेळके हिने रक्षा बंधन सणाचे महत्त्व व भारतीय संस्कृतीतील त्याचे स्थान याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थिनींनी आपल्या वर्गबंधूंचे औक्षण करून त्यांच्या मनगटावर प्रेम, स्नेह व बंधुभावाचे प्रतीक असलेल्या राख्या बांधल्या.

कार्यक्रमात यशश्री पाठक यांनी सुंदर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी व्यंकटेश केंद्रे याने केले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना शाळेतर्फे रक्षा बंधनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक विभागाचे शिक्षक व शिक्षिका नम्रता डांगे, किरण रेणके, पवन माळी व यशश्री पाठक यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

## ग्रामसेवकास तात्काळ निलंबित करा शिवसेनेची मागणी

**निलंगा/मोईज सितारी:** तालुक्यातील मौजे सांगवी येथील ग्रामसेवक दोन वर्षापासून ग्रामसभा घेतली नाही बोगस ८अ दिला छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केल्याप्रकरणी ग्रामसेवक निलंबित करावे अशा अशयाचे निवेदन सांगवी ग्रामस्थांच्या वतीने व शिवसेनेच्या वतीने गटविकास अधिकाऱ्यास देण्यात आले.

सांगवी (जेवरी) तालुका निलंगा जिल्हा लातूर येथील ग्रामसेवक हे गेल्या दोन वर्षापासून ग्रामसभा घेत नाहीत. ग्रामसभा घ्यावी यासाठी अनेकदा गटविकास अधिकाऱ्यांकडे गावातील नागरिकांनी निवेदन अर्ज अर्ज दिला. गावकऱ्याकडून उपोषणासाठी अर्ज दिला. त्यानंतर प्रशासनाकडून ग्रामसभा घ्यावी असे ग्रामसेवक पत्र दिले असताना सुद्धा दिलेल्या तारखेला मेडिकलची रजा टाकून अनुपस्थित राहिला. गटविकास अधिकारी यांच्या सूचनेनुसार त्याच दिवशी सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा परिषदेचे मुख्याध्यापक सचिव म्हणून ग्रामसभा घेतली. या ग्रामसभेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीर्णोद्धाराच्या प्रश्नाच्या संदर्भात अनुपस्थित राहिल्याबद्दल ग्रामसेवकाला निलंबित करावे असे ग्रामसभेमध्ये ठराव घेण्यात आला. ग्रामसेवक गावकऱ्यांशी उद्धटपणे वागत असून मोजे. सांगवी या गावात कोणत्याही व्यक्तीच्या नावावर आठ अ ची नोंद नाही. कारण की हे गाव भूकंप पुनर्वसित असल्यामुळे आज तागायत कोणत्याही व्यक्तीला कबाला दिला गेला नाही. पण पैशासाठी पाटील माया सतीश यांच्याकडून दीड हजार रुपये घेऊन बोगस ८ अ दिला आहे. ज्याची चतुरसीमा सुद्धा बोगस आहे. बोगस आठ देणे व वारंवार सांगून सुद्धा ग्रामसभेस गैरहजर राहिल्याबद्दल अशा ग्रामसेवकाचे तात्काळ निलंबन करावे अन्यथा शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मीरगाळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनावर रवींद्र सरतापे गणेश सरतापे व्यंकट विठ्ठल बोरफळे शिवाजी व्यंकट सरतापे श्रीमंत शंकर राठोडे किरण सरतापे उमाकांत ज्ञानोबा शिंदे उपस्थित होते.

## निलंगा तालुका दुष्काळ जाहीर करा; शेतकऱ्यांना तातडीची मदत द्या
### – संभाजी ब्रिगेडचे तहसीलदारांना निवेदन



**निलंगा/मोईज सितारी:** निलंगा तालुक्यात पावसाअभावी खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे संपूर्ण निलंगा तालुका तात्काळ दुष्काळ घोषित करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम यांनी तहसीलदार, निलंगा यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे, मशागत व इतर शेतीकामांसाठी मोठा खर्च केला. मात्र अपेक्षित पाऊस न झाल्याने पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके करपण्याची वेळ आली आहे. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर आणखी मोठे संकट ओढवले आहे.

प्रशासनाने तालुक्यातील परिस्थितीची तातडीने पाहणी करून आवश्यक सर्वेक्षण व पंचनामे करावेत आणि शासनाकडे दुष्काळग्रस्त घोषित करण्याचा प्रस्ताव त्वरित पाठवावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने तातडीने निर्णय घेऊन दिलासा द्यावा, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम यांनी केली आहे. यावेळी तालुकाध्यक्ष परमेश्वर बोधले, शहराध्यक्ष अमोल गवळी, गणपत वरवटे, सिद्धेश्वर तेलंगे, शाम हिबारे, महेश मोरे, हणमंत मोरे, नितीन मोरे यांच्यासह अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रमुख मागण्या......**

- संपूर्ण निलंगा तालुका दुष्काळग्रस्त घोषित करावा.
- नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी.
- पात्र शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम त्वरित मिळवून द्यावी.
- जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी.
- रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे उपलब्ध करून द्यावीत.

## महाराष्ट्र महाविद्यालयात सिकल सेल व थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी कार्यशाळा उत्साहात संपन्न

**निलंगा/मोईज सितारी:** सिकल सेल व थॅलेसेमिया या आनुवंशिक रक्तविकारांबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग डॉ. भालचंद्र रक्तपेढी लातूर यांच्या वतीने सिकल सेल व थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के. एन.कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भालचंद्र ब्लड बँकेचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. योगेश गावसाने हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.बी.एस. गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी विभागाचे समन्वयक डॉ.डी.एस चौधरी, प्रा डॉ.



जी जी शिवशेट्टे, प्रा.गिरीश पाटील हे होते.या कार्यशाळेत विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यशाळेदरम्यान तज्ज्ञांनी सिकल सेल व थॅलेसेमिया आजाराची कारणे, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, योग्य उपचार तसेच वेळेवर तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. आनुवंशिक रक्तविकारांचे योग्य वेळी निदान झाल्यास त्याचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येते, त्यामुळे नियमित तपासणी व जनजागृती आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

यावेळी ३०० पेक्षा अधिक उपस्थितांची आवश्यक रक्ततपासणी करण्यात आली. सहभागी विद्यार्थ्यांना व नागरिकांना या आजारांबाबत माहितीपत्रके वितरित करून आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता मुळे हिने केले. या

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. व्हि पी.सांडूर, प्रा.एस.एस बदनाळे, स्वयंसेवक विद्यार्थी , शिक्षक, कर्मचारी, आरोग्य विभागातील तज्ज्ञ व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. समाजामध्ये आनुवंशिक रक्तविकारांविषयी जागरूकता वाढविण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

### कलाकार ..

व्हिडिओ कॅमेरे नीत
फिरत राहे प्रेक्षकांत
टाळ्यावाजवणारे ते
जोशा दिसतात हात

तुटती हलवून माना
कसे उत्साही दे दाद
कसली नाही ददात
रसिकजनाधन्यवाद

अभिमानानेसांगतात
हजर मी कार्यक्रमात
कौतुक करी स्वताचे
रे सगळे एका क्रमात

कलाकार ते करतात
मेहनत दिवस न् रात
मिळावी वाटते जागा
रसिकजनांच्या उरात

कलाकारांच्या सोबत
कैक फोटो काढतात
सोशल मिडियावरती
रे उत्साहात धाडतात

ख-याप्रेमाचा भुकेला
तो लांब राहे चारहात
अप्रतिम कलाकृतीस
कसे फसवे हातोहात

कलाकार आविष्कार
प्रयास मग्न अतोनात
प्रकार पाहून बेगडी हे
खिन्न विछिन्न रे मनात

– **हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

## अहमदपूर पोलिसांचा बडगा: नियमभंग करणाऱ्या डीजे मालक व मंडळांवर न्यायालयात खटले
## पारंपरिक वाद्यांनाच प्राधान्य देण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीदरम्यान कायदेशीर अटी व शर्तींचे उल्लंघन करत बेकायदेशीरपणे मोठ्या क्षमतेच्या डॉल्बी व डीजे सिस्टीमचा वापर करणाऱ्यांवर अहमदपूर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. याप्रकरणी ३ प्रमुख जयंती मंडळांच्या अध्यक्षांसह संबंधित डीजे मालकांवर माननीय न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, प्रशासनाने उत्सव काळात डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. मिरवणुकीत मर्यादेपेक्षा जास्त आवाजात डॉल्बी वाजवली जात असल्याचे निदर्शनास आल्यावर, पीएसआय रवी बुरकुले यांच्या पथकाने घटनास्थळी 'नॉईज लेव्हल मीटर'द्वारे आवाजाची अचूक पातळी मोजून तांत्रिक पुरावे गोळा केले. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनी सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला. या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या लाखो रुपयांच्या डॉल्बी सिस्टीम तब्बल दोन महिने कायदेशीर प्रक्रियेत अडकून पडल्यानंतर न्यायालयाच्या आदेश आल्यानंतर सोडण्यात आल्या.

यात कारवाई झालेली प्रमुख मंडळे व आरोपी यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळ, इंदिरानगर (अध्यक्ष व डीजे मालक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळ, बौद्ध नगर (अध्यक्ष व डीजे मालक) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळ, भीम नगर (अध्यक्ष व डीजे मालक) यांचा समावेश आहे.

पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ च्या कलम १५ व १९ तसेच ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० अंतर्गत हा गंभीर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. कायद्यानुसार यामध्ये कठोर शिक्षेची तरतूद आहे. दोषी आढळल्यास ५ वर्षांपर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा तसेच १ लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. नियमभंग सुरूच राहिल्यास दर दिवशी ५,००० रुपये अतिरिक्त दंड आणि गुन्हा पुनरावृत्त झाल्यास ७ वर्षांपर्यंत कारावासाची तरतूद आहे.

उत्सवाचा आनंद कोणाच्याही त्रासाचे कारण बनू नये, असे आवाहन करत पोलीस प्रशासनाने पुढील सर्व सण व मिरवणुकांमध्ये डीजे व डॉल्बीचा वापर टाळण्याचे कडक निर्देश दिले आहेत. कर्णकर्कश डीजेच्या दणदणाटामुळे वृद्ध, लहान मुले, आजारी व्यक्ती आणि मुक्या प्राण्यांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो. याउलट ढोल-ताशा, लेझिम, झांज व तुतारी यांसारख्या पारंपरिक वाद्यांच्या गजरामुळे सणाचा उत्साह तर वाढतोच, शिवाय आपली समृद्ध संस्कृतीही जपली जाते.




कायद्याची कठोर अंमलबजावणी टाळण्यासाठी आणि महिनान महिने कोर्टाच्या फेऱ्या व आर्थिक नुकसान टाळण्यासाठी सर्व मंडळांनी नियमांचे पालन करत पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून उत्सव साजरे करावेत, असे आवाहन अहमदपूर पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

लातूर समाचार रोज वाचा ऑनलाईन
www.latur samachar.com

निलंगा शहरातील
एलआयसर
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६